जोड पत्र – "अ"

# शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणे बाबत

(अर्जाचा नमुना)

प्रति,

मा.जन माहिती अधिकारी

नगर सचिव विभाग ,मिरा भाईंदर मनपा

१ ) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- श्री निलेश संपत फापाळे

२ ) अर्जदाराचे संपूर्ण पत्ता :- स्वप्न घर ,घोडबंदर गांव ,पोष्ट मिरा रोड, ता ,जि ,ठाणे पिन ४०११०७ मोबाईल :- ९१७२६५८८२३

३ ) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल - मिरा भाईंदर महानगर पालिकेचे आरक्षण क्रमांक ३२६ ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा महासभा ,तहकूब महासभा ,विशेष महासभा , व स्थायी समिती सभा बाबत माहिती मिळावी.

४ ) माहितीचा विषय :- मिरा भाईंदर महानगर पालिकेने आरक्षण क्रमांक ३२६ ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा महासभा ,तहकूब महासभा ,विशेष महासभा , व स्थायी समिती सभा बाबत माहिती मिळावी.

५ ) माहिती ज्याच्याशी संबधित असेल तो कालावधी :- सन २०११ ते आज रोजी पर्यंत .

६ ) माहितीचे वर्णन :- १ ) मा ,महासभा , मा स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेले संबधित विभागाचे गोषवारे .२ ) मा.महासभा ,मा,स्थायी समितीने दिलेल्या मंजुरीच्या छायांकित सत्यप्रती मिळाव्यात.३ ) लेखी उपलब्ध असलेला इतीवृतांत प्रती मिळाव्यात.४ ) उपस्थित महापौर ,आयुक्त ,उपमहापौर तसेच सर्व नगर सेवक ,अधिकारी यांची उपस्थित असल्या बाबत घेतलेल्या नोंदी यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.

७ ) माहिती : व्यक्तीशा मिळावी

८ ) अर्जदार : दारिद्र्य रेषेखाली खाली आहे किंवा नाही :- नाही

९ ) ठिकाण :- भाईंदर

१० ) दिनांक :- / २ / २०२२

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ९९
दिनांक:- 29 / 2 /2022

अर्जदार

श्री निलेश संपत फापाळे

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./९९ /2022 दिनांक :- २१/३ /2022

प्रति,
श्री. निलेश स. फाफाळे,
स्वप्नघर, घोडबंदर गाव, पो. मीरा,
ता.जि.ठाणे, 401107.

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्रमांक 326 ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा. महासभा, तहकुब महासभा, विशेष महासभा व स्थायी समिती सभाबाबत माहिती मिळावी.**

संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 21/02/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./11/2022, दि. 24/02/2022.

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र 01 अन्वये आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्रमांक 326 ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा. महासभा, तहकुब महासभा, विशेष महासभा व स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात आलेले गोषवारे, ठराव, इतिवृत्तांत व सदर सभेस उपस्थित महापौर, आयुक्त, उपमहापौर तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी यांची उपस्थितीबाबत कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांचा तपशिल, संदर्भित पत्र 02 मध्ये नमुद करुन, उक्त कागदपत्रांसाठी एकुण 34 पानांकरिता रक्कम रुपये 68/- (अक्षरी रुपये अडुसष्ठ मात्र) इतके शुल्क महानगरपालिका फंडात भरणा करणेबाबत आपणांस कळविले होते. आपण सदर शुल्क रुपये 68/-, पावती क्र. 150540 अन्वये दि. 21/03/2022 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस संदर्भित पत्र 02 मध्ये नमुद कागदपत्रांच्या सत्यप्रती या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत. (एकूण पाने 15)

सदर माहिती उक्त प्रकरणी नगरसचिव विभागात उपलब्ध अभिलेख्यावरुन देण्यात आलेली असून, दिलेल्या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./११ /2022 दिनांक :- २४/२ /2022

प्रति,
**श्री. निलेश स. फाफाळे,**
**स्वप्नघर, घोडबंदर गाव, पो. मीरा,**
**ता.जि.ठाणे, 401107.**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्रमांक 326 ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा. महासभा, तहकुब महासभा, विशेष महासभा व स्थायी समिती सभाबाबत माहिती मिळावी.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 21/02/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्रमांक 326 ट्रक टर्मिनल बाबत झालेल्या मा. महासभा, तहकुब महासभा, विशेष महासभा व स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात आलेले गोषवारे, ठराव, इतिवृत्तांत व सदर सभेस उपस्थित महापौर, आयुक्त, उपमहापौर तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी यांची उपस्थितीबाबत कागदपत्रांची मागणी केलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की, यापूर्वी आपण दि. 21/01/2022 रोजी समविषयी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने आपणांस आरक्षण क्रमांक 326 ट्रक टर्मिनल बाबत मा. महासभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये पारित झालेले ठराव व गोषवाऱ्याच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

आपणांस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांव्यतिरीक्त संबंधीत प्रकरणांवर झालेल्या चर्चेचे इतिवृत्तांतांत आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. सदर सभेच्या इतिवृत्तांतामध्ये सभेस उपस्थित महापौर, उपमहापौर तसेच सर्व नगरसेवक यांचे उपस्थिती व गैरहजेरीबाबतची नोंद घेण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | एकुण पाने |
|---|---|---|
| 1 | मा. महासभा दि. 2/3/2015 (दि. 07/02/2015 रोजीची तहकुब सभा) रोजीच्या प्रकरण क्र. 63 वरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 6 |
| 2 | मा. महासभा दि. 30/3/2015 (दि. 23/03/2015 रोजीची तहकुब सभा) रोजीच्या प्रकरण क्र. 87 वरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 7 |
| 3 | मा. महासभा दि. 19/06/2017 रोजीच्या प्रकरण क्र. 32 वरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 6 |
| 4 | मा. महासभा दि. 08/11/2017 रोजीच्या प्रकरण क्र. 26 वरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 5 |
| 5 | मा. स्थायी समिती सभा दि. 29/09/2018 रोजीच्या प्रकरण क्र. 92 वरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 3 |
| 6 | मा. स्थायी समिती सभा दि. 28/08/2013 रोजीचे प्रकरण क्र. 75 चा गोषवारा, ठराव व सदर प्रकरणावरील चर्चेचे व सभेस उपस्थितांची नोंदीचे इतिवृत्तांताची प्रत. | 7 |
| | **एकुण पाने** | 34 |

यासाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 34 पानांकरिता रुपये 68/- (अक्षरी रुपये अडुसष्ठ मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

पा.क्र.९५०५८० = ६८/-
दि.२९/३/२०२२

(कैलास दा. म्हात्रे)
**जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा. महासभा दि. ०२/०३/२०१५**

मा. महासभा शनिवार दि. ०७/०२/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ६३ ते ६६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार, दिनांक ०२/०३/२०१५ रोजी, मा. महासभा दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) संपलेनंतर महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १६) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १९) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २८) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| २९) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३०) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३१) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३२) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३३) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३४) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३५) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३६) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३७) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३८) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३९) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४०) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४१) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी,
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| ४३) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४४) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४५) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४६) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४७) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४८) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ४९) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५०) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५१) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५२) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५३) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ५४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५५) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ५६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५७) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५८) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५९) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६१) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६२) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६४) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६७) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ६८) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६९) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७०) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७२) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७३) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७४) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७५) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७६) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| २) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ३) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ४) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| ६) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ७) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १०) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ११) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | सदस्या |
| १२) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| १३) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १४) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| १५) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १६) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| १७) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

१)　म्हात्रे सुर्यकांत खंडोजी　　　　　　　　सदस्य

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३, मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे ट्रक टर्मिनल व बस डेपो याप्रमाणे नावामध्ये बदल करणेबाबत.

**प्रशांत केळूसकर :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) हे आरक्षण मौजे घोडबंदर, स.क्र. १६पै., १७पै., १८पै., १९पै., २०पै., ३१पै. या जागेमध्ये दर्शविलेले असून सदर जागेपैकी १२१४५ चौ.मी. क्षेत्र संक्रमण शिबीर (च्द्धङ्खदद्मत्ध्य क्ङ्खध्र्) साठी आरक्षित ठेवणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारच्या फेरबदलासाठी शासनाने जा.क्र. टिपीएस-१२११/२४८/प्र.क्र.२९४/११/नवि-१२, दि.२७/०३/२०१२ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर आरक्षणासाठी आ.क्र. ३२६-बी दिलेला आहे.

त्याप्रमाणे सदरच्या दोन्ही आरक्षणाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६बी | संक्रमण शिबीर | १२१४५ | ९८९० |
| २ | ३२६ | ट्रक टर्मिनल | २२७५५ | १२२६० |

यापैकी संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी यापूर्वी रेखांकन नकाशे मंजूरी दिलेली असून जागेवर प्रत्यक्ष इमारतींचे बांधकाम सुरु झालेली नाही.

सदरचे संक्रमण शिबीराच्या जागेची हद्द मंजूरीप्रमाणे आयताकृती नसल्यामुळे उर्वरीत क्षेत्रही आयताकृती शिल्लक राहत नव्हते. यास्तव संक्रमण शिबीराच्या भूखंडाची आखणी आयताकृती ठेवल्यास संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी व उर्वरीत ट्रक टर्मिनलच्या आरक्षणाच्या जागेमधील बांधकामासाठी व्यवस्थित जागा उपलब्ध होऊ शकत असल्यामुळे सदरप्रमाणेच्या फेरबदलासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. १०(४) प्रमाणे दि.२७/११/२०१४ रोजी मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे ट्रक टर्मिनल या आरक्षणासाठी २२७५५ चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या बसेसच्या दुरुस्तीसाठी, बसेस ठेवणेसाठी आवश्यक जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे उपलब्ध नसून बस डेपोच्या कामासाठी जागतीक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे.

यास्तव सदरच्या आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे आ.क्र. ३२६ (ट्रक व बस डेपो / टर्मिनल) याप्रमाणेच्या नावामध्ये बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच बस डेपोसाठी जागतीक बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध होत असून अल्पावधीतच नवीन बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सदर ठरावानुसार बस डेपोचे बांधकाम करणेस तसेच सदर ट्रक टर्मिनल व बगीचा या आरक्षणाच्या हद्दीवर घोडबंदर गावच्या रस्त्यापासून ६०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यापर्यंत १२.०० मी. रुंदीचा रस्ता तयार करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**मा. आयुक्त सो. :-**

आम्ही जो प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे. ट्रक टर्मिनल, बस डेपो असेच मंजूर केले आहे ना. नाहीतर काय होईल आपल्याला केंद्र शासनाचे पैसे मिळणार नाहीत. प्रशासनाने दिलेला प्रस्ताव मंजूर म्हटला आमचा विषय संपलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

गोषवारा दिलेला नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

गोषवारा दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठीक आहे. तुमचा ठराव मंजूर केलेला आहे. त्याच्यात अशी सुधारणा केली आहे की त्या ट्रक टर्मिनलला लागून गार्डन रिर्झव्हेशन आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा रस्ता नाही. ट्रक टर्मिनलचे आरक्षण



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

खूप मोठे आहे. उदा. ह्या ठिकाणी संक्रमण शिबीर करतो त्याठिकाणी डेपो करतो. त्यामुळे मध्ये आम्ही एक रस्ता सुचवला आहे. गार्डनसाठी १२ मिटरचा रस्ता करा म्हणजे इकडून आपल्याला बससाठी वापरता येईल. तिकडून आपल्याला संक्रमण शिबीरसाठी वापरता येईल. तेवढे आम्ही सुचवले आहे.

**दिपक खांबित :-**

रस्त्याचा पण फेरबदल........

**नरेंद्र मेहता :-**

रस्ता आम्ही आपल्या जागेतून करतो. दुसऱ्या जागेतून करत नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

तो फेरबदल होईल ना. रस्ता डी.पी. मध्ये पाहिजे. ह्याच्यात मी सुचना मांडतो रस्त्यासहीत फेरबदल करावा. मा. आयुक्त साहेब सगळे विषय संपलेले आहेत. ६४,६५,६६ हे तिन्ही विषय मॅडम अगोदरच्या सभेत आलेले आहेत. म्हणून विनंती करत आहे हे तिन्ही विषय मागे घ्यावे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब आपण सांगितले "ज" खाली ह्या महानगरपालिकेची पाश्वभूमी बघा. "क" खाली आपण आम्हाला अनेक प्रस्ताव दिले. २५ कोटी, ३० कोटी त्याला कुठे गोषवारा दिलेला. "क" खाली प्रस्ताव दिला बहुमत होते मांडले, मंजूर झाले. काम सुरु झाले संपले.

**जुबेर इनामदार :-**

"क" खाली २/३ सभागृहाची मंजूरी लागते. सभागृहात बसलेला प्रत्येक सदस्य त्याला मंजूरी देतो.

**नरेंद्र मेहता :-**

तिकडे कुठे प्रशासनानी आपले मत दिलेले असते. त्यामध्ये कसे करायला पाहिजे. इकडे मंजूर झाले की प्रशासनाकडे जायचे तयारी करायची परत यायला पाहिजे.

**मा. आयुक्त सो. :-**

विषय असा नाही पूर्वी काय होते आणि आज काय आहे. आजचा विषय नाही समजा अगोदर कोणी चूक केली असेल तर आपण दुरुस्ती नाही करायची का? आपले काम सोयीस्कर होण्यासाठी मी आपल्याला मार्ग सांगितला आहे. पुन्हा विषय राहणार नाही.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम प्रशासनानी जानेवारीच्या पहिल्या विकमध्ये प्रत्येक नगरसेवकाला पत्रक काढले होते. आपआपल्या वॉर्डमध्ये प्रभाग निधी आणि नगरसेवक निधीच्या बाबतीत कामे सुचवायची होती. परंतु आम्ही पत्र देऊन दोन महिने झाले एकही प्रभाग निधी नाही नगरसेवक निधी नाही.

**मदन सिंग :-**

साहेब प्रभाग निधी आणि नगरसेवक निधीमध्ये कपात केली आहे. १० लाखाचे, ५ लाख केले. १५ चे ६ लाख केले.

**नरेंद्र मेहता :-**

मी जरा व्यवस्थित सुधारणा करुन घेतो. मा. आयुक्तांनी नगरसेवक निधी ७ लाख रु. बजेटमध्ये तरतूद केली आणि प्रभाग निधी १५ लाखाचे १०-११ काय सुचवले होते आणि स्टँडिंगनी ठराव केला होता १५ लाख प्रभाग निधी आणि १० लाख नगरसेवक निधी मागील वर्षाप्रमाणे करावे पण मा. आयुक्तांनी ते मानायला तयार नव्हते त्याला अंतिम निर्णय सभागृहाचा झाला नव्हता. अंतिम निर्णय होता होता मागील वर्ष गेले. मागील फेब्रुवारीत आम्ही बजेट मंजूर केले. आता खांबित साहेबांचे असे म्हणणे आहे मागच्या वेळेला टायमावर दिले नव्हते म्हणून ते स्पिल ओव्हर झाला म्हणून घ्या. वेळचा जो निधी होता तो त्यामध्ये अ‍ॅडजस्ट झाला म्हणून तुम्हाला काय द्यायची आवश्यकता नाही. हे चूकीचे आहे. प्रशासनानी कॅरी फॉरवर्ड खर्च केला पाहिजे होता की ऑलरेडी आम्ही नगरसेवकाचा खर्च काढला आहे. त्यांनी ३१ मार्चच्या अगोदर पत्र दिलेले आहे. तुम्ही त्याची प्रोसेस सुरु केली आहे. म्हणजे ऑडिटरनी त्याला मान्यता दिली आहे. त्यानंतर हे आपले काम होते की त्याला पूढच्या बजेटमध्ये ती अमाऊंट तरतूद करायला पाहिजे. त्याच्यात सदस्यांची काही चूक नाही. प्रभाग समितीने एखादा ठराव केल्यानंतर हे आपले कर्तव्य आहे. स्पिल ओव्हर जरी होत असेल तरी ह्या वर्षी स्पिल ओव्हर म्हणून घ्या. आणि ह्या बजेटमध्ये सुधारणा करुन घ्या. नगरसेवक जे अडीज वर्ष झाले तो निधी मिळावा आणि १५ लाख पर्यंत प्रभाग निधी मिळावा. स्पिल ओव्हर होत असेल तर ह्या बजेटमध्ये त्याची विशेष तरतूद करावी. ह्या वर्षीचे १० लाख आणि मागील १० लाख बाकी आहे. २० लाखाची तरतूद केली तर हरकत नाही. पण त्यांना त्यांचा अधिकार द्यावा अशी विनंती.

**मा. आयुक्त सो. :-**

४ तारखेला आम्ही बजेट सादर करतो. त्याच्या स्टँडिंग कमिटी आणि जनरल बॉडी .................

**नरेंद्र मेहता :-**

आपण काम काढून घ्या त्यांना थांबवू नका आता ३१ मार्च होईल.

**मा. आयुक्त सो. :-**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

साहेब मागच्या बजेटमधली काम थांबणारच.

**नरेंद्र मेहता :-**

मागची १० लाख ह्या वर्षाची तरतूद आहे. मागच्या वेळी काही कारणाने आमच्या कामाचा खर्च ह्या बूकमध्ये पडला नाही. आता तो पडला तर खांबित साहेबांचे म्हणणे आहे मागच्या वेळी पडला नाही ह्या वेळी तरतूद आहे ती त्याच्यात ॲडजस्ट झाली आणि विषय संपला. असं होणार नाही ना.

**मा. आयुक्त सो. :-**

खुलासा करा आणि नगरसेवकाना जो निधी दिला जातो तो बजेटच्या २ टक्के आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

आता किती आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

आता १२५०.

**नरेंद्र मेहता :-**

आपण खाली आलात त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन.

**मा. आयुक्त सो. :-**

खाली नाही आम्ही ती वस्तूस्थिती आहे ती समोर मांडणार. आम्ही कॅल्क्यूलेट करुन सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला सगळे कायदे दाखवू नका काही गोष्टी परंपराप्रमाणे चालतात. प्रत्येक गोष्टीला कायदयात तरतूद नसते. ह्या परंपरेचे आपण पालन करावे. बाकी तर आपण काही करत नाही तर १० लाख १५ लाखाची काम तरी करा. खांबित साहेबांना स्पष्ट सांगावे ज्याची कामे निधीप्रमाणे प्रस्तावित केली करा आपल्याला एखाद्या रकमेमध्ये फरक होत असेल तर ह्या बजेटमध्ये आपण सुधारीत आणि अंदाज त्या दोन्ही खांबित साहेब दोन्ही पूट अप करा.

**दिपक खांबित :-**

प्रश्नही तुम्हीच विचारले आणि उत्तरही तुम्हीच दिले. तुम्ही उत्तर असे दिले की जी काही ह्या वर्षी ४ लाखाचा डिफरन्स आहे १० लाखाचा डिफरन्स आहे ती तरतूद आणि पुढची तरतूद बजेटला एकत्र करणार तर ती बजेटला तरतूद झाली की आपण १ एप्रिल नंतर ........................

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला हे सांगतो त्यासाठी आम्ही करु पण ह्यांची काम करा.

**दिपक खांबित :-**

बजेट नसताना कुठल्या कामाला मंजूरी कशी मिळणार. आम्हाला पेपरमध्ये लिहायला लागते की ............

**नरेंद्र मेहता :-**

मला हे ही मान्य आहे. मला हे ही मान्य आहे. पण मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम, सभागृहात रुलिंग द्यावे की एखाद्या अधिकाऱ्यांनी असा वापर केला असेल तर त्याला तुम्ही निलंबीत करणार. मी तुम्हाला ४ काम दाखवतो की ह्या बजेटमध्ये तरतूद नाही मागच्या वर्षी झाले तरी ह्या वेळेला खर्च पडलेला आहे. अशी ह्या ठिकाणी रुलिंग द्या. त्या अधिकाऱ्याला आपण घरी बसवणार. आम्ही १ नाही १० काम दाखवतो. आम्हाला काय तरी काय शिकवता १० लाख नगरसेवक निधीसाठी एवढा मोठा कायदा दाखवू का काम मला सांगा ना. ४ काम अशी दाखवा की तरतूद नाही आणि खर्च केला. ते जाऊ द्या आता तुम्ही आमच्याकडे सुधारीत बजेटचा मंजूरी घेतली. ७ कोटी मिरारोडची केले ना मंजूर. वर्क ऑर्डर दिली ना. बजेटमध्ये प्रोव्हिजन होती का?

**दिपक खांबित :-**

साहेब १० कोटीची होती.

**नरेंद्र मेहता :-**

नाही होती. काही तरी थापा मारु नका. आम्ही तुम्हाला सुधारीत मान्यता दिली आहे. काम मंजूर झाले काम चालू झाले. आणि सुधारीत आज देतो. आम्ही नकार दिला असता तर काय केले असते.

**मा. आयुक्त सो. :-**

तुमच्या गावातली काम झाली नसती.

**प्रशांत दळवी :-**

आता जी नगरसेवक निधीची काम होणार ती आमच्या घरातली नाही होणार.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब उद्या कोर्टमॅटर झाले असते तर त्याला जबाबदार कोण? प्रशासनाला काय आम्ही विषय आता मागे घेतो.

**मा. आयुक्त सो. :-**

अधिकारी आणि पदाधिकारी ह्याचे चिखला पाण्याचे नाते आहे. तुमच्या शिवाय आमचे जमत नाही आमच्याशिवाय तुमचे जमत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

आमचे जमवून घ्या ना.

**मा. आयुक्त सो. :-**

जमवून घेतो ना. पण अशा पध्दतीने नाहीना. तुमचा मुद्दा माझ्या लक्षात आला मी काय करायचे ते बघतो.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे ट्रक टर्मिनल व बस डेपो याप्रमाणे नावामध्ये बदल करणेबाबत.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) हे आरक्षण मौजे घोडबंदर, स.क्र. १६पै., १७पै., १८पै., १९पै., २०पै., ३१पै. या जागेमध्ये दर्शविलेले असून सदर जागेपैकी १२१४५ चौ.मी. क्षेत्र संक्रमण शिबीर (च्ह्वड्ढदद्मत्द्य क्ड्ढश्र्द्र) साठी आरक्षित ठेवणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारच्या फेरबदलासाठी शासनाने जा.क्र. टिपीएस-१२११/२४८/प्र.क्र.२९४/११/नवि-१२, दि.२७/०३/२०१२ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर आरक्षणासाठी आ.क्र. ३२६-बी दिलेला आहे.

त्याप्रमाणे सदरच्या दोन्ही आरक्षणाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६बी | संक्रमण शिबीर | १२१४५ | ९८९० |
| २ | ३२६ | ट्रक टर्मिनल | २२७५५ | १२२६० |

यापैकी संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी यापूर्वी रेखांकन नकाशे मंजूरी दिलेली असून जागेवर प्रत्यक्ष इमारतींचे बांधकाम सुरु झालेली नाही.

सदरचे संक्रमण शिबीराच्या जागेची हद्द मंजूरीप्रमाणे आयताकृती नसल्यामुळे उर्वरीत क्षेत्रही आयताकृती शिल्लक राहत नव्हते. यास्तव संक्रमण शिबीराच्या भूखंडाची आखणी आयताकृती ठेवल्यास संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी व उर्वरीत ट्रक टर्मिनलच्या आरक्षणाच्या जागेमधील बांधकामासाठी व्यवस्थित जागा उपलब्ध होऊ शकत असल्यामुळे सदरप्रमाणेच्या फेरबदलासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. १०(४) प्रमाणे दि.२७/११/२०१४ रोजी मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे ट्रक टर्मिनल या आरक्षणासाठी २२७५५ चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या बसेसच्या दुरुस्तीसाठी, बसेस ठेवणेसाठी आवश्यक जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे उपलब्ध नसून बस डेपोच्या कामासाठी जागतीक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे.

यास्तव सदरच्या आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे आ.क्र. ३२६ (ट्रक व बस डेपो / टर्मिनल) याप्रमाणेच्या नावामध्ये बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच बस डेपोसाठी जागतीक बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध होत असून अल्पावधीतच नवीन बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सदर ठरावानुसार बस डेपोचे बांधकाम करणेस तसेच सदर ट्रक टर्मिनल व बगीचा या आरक्षणाच्या हद्दीवर घोडबंदर गावच्या रस्त्यापासून ६०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यापर्यंत १२.०० मी. रुंदीचा रस्ता तयार करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदन :- श्रीम. सुमन कोठारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा. महासभा दि. ३०/०३/२०१५**

मा. महासभा सोमवार दि. २३/०३/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ८२ ते ८८ व पुरक घोषणा क्र. ८९ ते ९३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार, दिनांक ३०/०३/२०१५ रोजी, मा. विशेष महासभा दि. ३०/०३/२०१५ संपलेनंतर महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सामंत प्रमोद जयराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १४) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १५) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २८) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| २९) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३०) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३१) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३२) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३४) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३५) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३६) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३७) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३८) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३९) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४०) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४१) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४२) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४३) | संदिप मोहन पाटील | सदस्य |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| ४४) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४५) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४६) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४७) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४८) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४९) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५०) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५१) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५३) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५४) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५५) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५६) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ५७) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५८) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ५९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६०) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६१) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६२) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६५) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६६) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ६७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| २) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ६) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ७) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ८) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ९) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ११) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| १२) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| १३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १४) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| १५) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| २) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ४) | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशीद | सदस्या |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | २ | पाटील सुनिता कैलास |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | ३ | झिनत रऊफ कुरेशी |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ४ | विराणी रेखा अनिल |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | शिल्पा भावसार | ५ | डिसा मर्लिन मर्विन |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ६ | काझी रशीदा जमील |
| ७ | डॉ. नयना मनोज वसानी | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | बगाजी शर्मिला विल्सन |
| ८ | जैन गिता भरत | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | ८ | इनामदार जुबेर |
| ९ | अरोरा दिपिका पंकज | ९ | पाटील वंदना विकास | ९ | वेतोसकर राजेश शंकर |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | वंदना रामदास चक्रे | १० | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम |
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | अनिता जयवंत पाटील | ११ | सामंत प्रमोद जयराम |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | पांडे हंसूकुमार कमलकुमार |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | डॉ. आसिफ शेख | | |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | नरेश तुकाराम पाटील | | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | भोईर कमलेश यशवंत | | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | वंदना मंगेश पाटील | | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | | | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | | | |
| २० | जैन दिनेश तेजराज | २० | | | |
| २१ | जैन रमेश धरमचंद | २१ | | | |
| २२ | डॉ. राजेंद्र जैन | २२ | | | |
| २३ | निलम हरिश्चंद्र ढवण | २३ | | | |
| २४ | तारा विनायक घरत | २४ | | | |
| २५ | शुभांगी महिन कोटियन | २५ | | | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | | | |
| २७ | परमार अनिता भरत | २७ | | | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | २८ | | | |
| २९ | गावंड मंदाकिनी आत्माराम | २९ | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | | | |
| ३१ | संदिप मोहन पाटील | ३१ | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३२ | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | | |
| ३८ | जाधव मोहन महादेव | | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७, आ.क्र. ३२६अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

उपरोक्त प्रकरणानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात सोयीसुविधा करीता महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथे टी. टर्मिनल विकसित करावयाचे आहे. सद्यस्थितीत परिवहन



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

उपक्रमात ५० बसेस असून केंद्रशासनाच्या ख्ाःछङ्ग या योजने अंतर्गत १०० बसेस मंजूर झालेल्या आहेत. तरी एकूण १५० बसेस पार्कींग, दुरुस्ती संबंधीत कामकाजाकरीता सोयीसुविधायुक्त असे टी. टर्मिनल नमूद जागेत विकसित करणे गरजेचे आहे. करीता टी. टर्मिनल विकसित करणेकरीता सुमारे रुपये १४.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील काम परिवहन उपक्रमातर्फे चालविण्यात येणाऱ्या बसेस सेवा कार्यक्षम करणेकरीता अत्यावश्यक असून त्यामुळेच परिवहन सेवा सुरळीत चालणार असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

ट्रक टर्मिनलमध्ये ह्याच्या अगोदर पण आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतली होती. २०१२ वर्ष सुरु झाल्यानंतर प्रशासनाने बांधकाम खात्याने विषय दिलेला ह्या अगोदर ह्याची मंजूरी घेतली आहे. आपण आर.टी.ओ. वाल्यांना करुन देणार होतो. प्रशासनाला विचारा नाही म्हणून उत्तर येऊ द्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महपौर मॅडम, १५/०१/२०१५ रोजी ठराव केला होता. १६० बसेसचा तात्पूरत्या स्वरुपाचा पार्किंगसाठी आपण ३७ खाली ३२६ शासनाकडे फेरबदलाचा प्रस्ताव पाठवला आहे. तो मंजूर होऊन आला आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, प्रस्तावित ठरावैंद्वारे मागीतलेली मंजूरी ही कामासाठी आहे. आपण बोलतात तो ठराव ३७ चा पाठवलेला आहे. मायनर मॉडिफिकेशनचा हा जो प्रस्ताव आलेला आहे. भांडवली कामासाठी आपण जी महासभेची आर्थिक आणि प्रशासकीय मान्यता घेतो. त्या आर्थिक आणि प्रशासकीय कामासाठी गोषवारा सादर केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे परंतु माझा सोपा प्रश्न आहे. ३७ खाली मायनर मॉडीफिकेशनचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असताना त्याच विषयावर त्याच जागेवर बस पार्किंगसाठी आपण आर्थिक प्रशासकीय मंजूरीचा विषय आणला आहे. हे योग्य आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, विषय आणणे आणि तो मॉडिफिकेशनचा प्रस्ताव पाठवणे ह्या दोन विभिन्न बाजू आहेत. दोन्ही कायदेशीर आहेत. ती प्रक्रिया चालू आहे आणि आपण ही मान्यता दिली की ह्याच्यात पुढची प्रोसेस चालू............

**जुबेर इनामदार :-**

तुमची मान्यता आल्यानंतर हे काम करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याचा खुलासा होऊ द्या. तुम्हाला मंजूरी भेटली नाही. प्रस्ताव मंजूर झाला नाही तुम्ही हे काम कसे काढले.

**नरेंद्र मेहता :-**

ट्रक टर्मिनल हे आरक्षण आहे. दोघांचा वापर ट्रक ट्रर्मिनल आणि ट्रान्सपोर्ट हे जवळपास ७० ते ८० टक्के सारखेच आहे. ह्यामध्ये ट्रक टर्मिनल आरक्षण विकसित करायला आपल्याला वेळ लागणार आहे. निविदा प्रोसेस आपण करणार आहोत. ग्राऊंड कॉंक्रीट करायला लागणार, चारही बाजूने रस्ता करायला लागणार, आपल्याला ग्राऊंड तयार करायला लागणार आहे. एफ.एस.आय. म्हणून एकदा ट्रक टर्मिनल वरुन ज्यावेळी आपल्याला ट्रान्सपोर्ट ऑफिस मिळतील त्यावेळी कदाचित आपल्याला एफ.एस.आय. उपलब्ध होतील त्यानंतर कर्मशियल हे ते आपण भविष्यात विचार करणार आहोत. सध्या जे करतो म्हणून त्याला टी ट्रान्सपोर्ट नाव दिले की आपण कुठल्याही कायद्याचे उल्लंघन करत नाही. ट्रक टर्मिनलमध्ये पण पूर्ण ग्राऊंड कॉंक्रीट करता येईल. रस्ते तयार करता येईल. कुंपण भिंत तयार करता येईल. शौचालय तयार करता येईल. तेवढ्या कामाची पुर्तता करतो इतक्या वेळात आपल्याला ट्रक टर्मिनल डेपोसाठी परवानगी मिळणारच आहे. अशी आमची खात्री आहे. म्हणून तो विषय आम्ही मंजूर केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. एका बाजूला टी टर्मिनल ह्या शब्दाचा प्रयोग दुसऱ्या बाजूला १५० बसेससाठी पार्किंग ह्याच गोषवाऱ्यामध्ये समाविष्ठ आहेत. फक्त आमचा प्रश्न आहे की ३७ खाली मायनर मॉडिफिकेशनला पाठवलेला प्रस्ताव ते मंजूर होण्याच्या आधी तुम्ही हे काम करणार का? आमचा प्रश्न प्रशासनाला आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपला प्रश्न आहे ३७ झाल्यानंतर हे काम करणार की आधी करणार? ३७ ची प्रक्रिया राज्य शासनाकडे चालू आहे. जो काही प्रकल्प ह्या राज्य शासनाचा आणि केंद्र शासनाचा प्राधान्यक्रम असलेला



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकल्प आहे. त्यामुळे ती मान्यता अतितातडीने लवकर मिळेल असे आपण गृहित धरतो. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामुळे सभागृहाला विनंती आहे की ह्याला आपण मान्यता द्यावी.

**जुबेर इनामदार :-**

नविन १०० बसेस आपल्याकडे येणार आहेत ५० आधीच्या आहेत ह्याच्याआधी ७/२/२०१५ रोजी आपण ठराव मांडला होता त्यामध्ये चार वेगवेगळ्या साईट्स भूखंड त्याच्यामध्ये १६० गाड्या उभ्या राहतील इतका आपला प्रस्ताव आहे आणि त्याच्यात ४ कोटी खर्च येणार आहे. ४ कोटी आणि १४ कोटी १० कोटी आपली जर बचत होत असेल तितक्याच बसेस उपलब्ध होणार आहेत तितक्याच बसेस तिथे उभ्या राहणार असतील तर हा ४ कोटी स्वस्त पडेल की १४ कोटी.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला आहे तो ४ कोटी हे अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अजूझेय नाही कुठलेही बांधकाम आपण करणार नाहीत. लॅन्ड क्लियरन्स करणे, गाड्या उभ्या करणे, नाईट पार्किंगसाठी जी पर्यायी व्यवस्था आहे अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची हा जो डेपो बांधतो तो अत्यंत अत्याधुनिक तात्पुरत्या स्वरुपाचा असा डेपो असणार आहे. बांधकाम जे करतो ते परमनन्ट स्ट्रक्चर आहे. ते जे आहे ते टेम्परारी स्ट्रक्चर आहे. ह्यामुळे त्या दोन्ही कामाच्या किंमतीमध्ये फार मोठी तफावत असणार आणि कामामध्ये पण तफावत असणार. हा जो डेपो बांधतो त्याच्यात पूढच्या ५-५० वर्षात कोणताही बदल करावा लागणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आधुनिक म्हणजे अत्याधुनिक ह्या देशामध्ये नसेल ह्या जगामध्ये नसेल ह्या भूमंडलमध्ये नसेल असा डेपो तुम्ही तयार करा ते करताना हे तुम्ही रद्द करणार का? ह्या ४ कोटीची मंजूरी तुम्ही घेतली आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

४ कोटी हे टेम्परारी पार्किंग उभ्या करायच्या त्या ठिकाणी १२५ बसेस उभ्या राहतील चार जागेवर आणि हा जो डेपो बांधतो तो पार्किंगसाठी नाही ह्यासाठी रिपेयर मेन्टेनन्स आणि त्या अनुषंगाने उभ्या असलेल्या गाड्या सर्वसाधारणपणे २५ ते ३५ गाड्या ह्या ठिकाणी उभ्या राहतील हा जो वर्कशॉप डेपो बांधतो इथे सर्व प्रकारच्या सुविधा मशीनरी इक्विपमेंट टूल्स त्या किमतीमध्ये फरक आहे. आता जर त्या टेम्परारी पार्किंगची व्यवस्था केली नाही तर आज रोजी आपल्या पूलाखाली ५० बसेस ज्याप्रमाणे उभ्या आहेत त्याच पध्दतीने येणाऱ्या व्हॉल्वो किंवा अत्याधुनिक करोडो रुपये खर्च करुन येणाऱ्या गाड्या रस्त्यावर उभ्या राहतील. ते होऊ म्हणून आपण तात्पुरत्या स्वरुपात टेम्परारी पार्किंग कारण आपल्याकडे परमनन्ट स्वरुपाची १२५ बसेस उभ्या राहतील अशी कोणतीही जागा उपलब्ध झाली नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब त्यासाठी आम्ही तुम्हाला विचारतो की, एका ठिकाणी ४ कोटी रुपयांचा खर्च करतो तिथे तुम्ही १२० बोललात गोषवाऱ्यामध्ये १६० नमूद होते त्याला ४ कोटी रुपयाची आपण मंजूरी दिली. दुसऱ्या बाजूला दुसरा विषय तुम्ही आणला. ३७ खाली जो प्रलंबित असताना तो विषय आणला आहे. ह्याच्यामध्ये १४ कोटी रुपये खर्च करायच अपेक्षित खर्च तुम्ही मांडता. आणि तिथे ५६ बसेसचीच पार्किंग आहे. ऑन ॲन्ड एनी गिव्हन टाईम आपल्याकडे १५० बसेसच उपलब्ध होणार आहेत. १०० होते ते नविन येणार आहेत ते ५० जुने म्हणजे १५० बसेस. तिथे तुम्ही चार कोटी खर्च करता आणि इथे परत १४ करता १८ कोटी म्हणजे ४ कोटीची कुठेतरी विल्हेवाट लावायची. तुम्हाला करायचे असेल तर एकच कराना. आम्ही कुठे नाही बोलतो झालेच पाहिजे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपण हे प्लान एकदा बघून घेतले ना की आपल्या सर्व शंकांचे समाधान होईल. १२५ बसेस १५० बसेस एका ठिकाणी उभ्या राहतील एवढी जागा आपल्याकडे उपलब्ध नाही. त्याचा एक स्टॅन्डर्ड स्पेस आहे आणि त्या दिलेल्या स्पेसनुसार आपल्याकडे एवढा मोठा डेपो उभा करायला जागा उपलब्ध नाही. म्हणून आपण चार पर्याय नाईट शेल्टींग म्हणजे फक्त रात्री उभ्या राहणाऱ्या बससाठी जागा आहेत.

**प्रमोद सामंत :-**

तिथे सांगितले की, १५० बसेस उभ्या राहण्यासाठी हे १४ करोड खर्च करणार आहेत. आणि त्याअगोदर दोन महिन्यांपूर्वी ३ ठिकाणी वेगवेगळी आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतली आहे. टेम्परारी डेपोसाठी ते तुमचे परिवहनवाले असतील तर ते सांगतील ते शासनाने फेटाळले आहे. त्यांना एकच डेपो पाहिजे आणि ते रिर्झव्हेशन चेंज करुन पाहिजे म्हणून तुम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे. तुम्ही आम्हाला कुठेतरी कन्फ्यूज करता ते पण करायचे आहे हे पण करायचे आहे. तिथे फक्त पंचवीसच बसेस राहणार बाकी बसेस इकडे राहणार हे जरा क्लियर करुन घ्या.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, मी कुठेही कन्फ्यूज करत नाही. तुम्ही समजून घेण्यामध्ये गलत करतात ज्या १५० बसेस आहेत ह्या १५० बसेससाठी नाईट शेल्टींग रात्री उभ्या करण्यासाठी जागा वेगळी त्या ज्या ४ जागा म्हणतो त्या टेम्परारी पार्किंग आहे. त्या बसेस फक्त रात्री उभ्या राहण्यासाठी तिकडे जातील आणि जो बस डेपो बांधू इच्छितो तो मनपा च्या वतीने एक अत्याधूनिक डेपो कि ज्यामध्ये इक्विपमेंट राहतील, बसेसची दूरुस्ती होईल, दूरुस्तीसाठी साधारणपणे जी स्पेस लागेल ती ३० ते ३५ गाड्या उभ्या राहतील त्यामधल्या



माहितीचा अधिकार अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

निम्या रिपेयर झालेल्या असतील किंवा निम्या रिपेयर झालेल्या नसतील अशा ३५ जागासाठी जे हॉल्टींग झाले. माझ्या सांगण्यामध्ये २-३ बसेस चूकत असेल परंतू मी काय सांगतो ती सिस्टीम समजून घ्या. हे जे टेम्पररी स्पेस आहेत त्या स्पेसला डेपो नाही आहेत तिथे कूठल्याही प्रकारची सूविधा असणार नाही फक्त रस्त्यावर गाडया उभ्या राहू नयेत कूठे तरी एका ठिकाणी असाव्या, त्याठिकाणी आपली सिक्यूरिटी असावी. म्हणून आपण त्या टेम्पररी चार जागा निश्चित केल्या.

**प्रमोद सामंत :-**

गोषवाऱ्यामध्ये १६० बसेस दिल्या आहेत हे चूकीचे आहेका. ३२६ आरक्षण बसेस उभ्या राहण्यासाठी ही जागा तूम्ही दिली आहे. ३२६ आरक्षण १६० बसेस उभ्या राहण्यासाठी जे काही काम करायचे त्याचे १४ करोड .......

**शर्मिला बगाजी :-**

मॅडम उत्तन धावगीच्या इथे जे वर्क स्टेशन बनवले होते म्हणजे बसेस रिपेरिंगसाठी त्याचा काय स्टेट्स आहे. त्याचा खूलासा करा की ते का बनवले होते. वर्क स्टेशन बनले आहे, परंतू काही काम होत नाही.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा.महापौर महोदय, उत्तनची जागा बस डेपोसाठी कूठल्याच पध्दतीने व्हिजीबल नाही. ती कशी सिलेक्ट केली कोणी केली ते समजण्याच्या पलीकडे आहे मी स्वतः त्या जागेवर जाऊन आलो त्या जागेचा जो रोड आहे त्याची त्यानी विड्थ बघीतली एका बाजूला पूर्ण खाली आहे. तिथे बस वळू शकत नाही. हया बसेस रोज रात्री तिकडे नाईट हॉल्टींगला तिथे जातील आणि सकाळी येतील. वर्षात एक तरी बस दरीत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढे गंभीर तिथे आहे. बसेस सारख्या डेली म्हणजे नाईट पार्किंगला नेणे आणि आणणे खोडू शकत नाही तो स्पॉट आपण बदललेला आहे. आणि वर्ल्ड बॅकेनेसूध्दा तो नामंजूर केलेला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

काम सूरु करायच्या अगोदर याची कल्पना नव्हती का? अधिकाऱ्याने बघीतले नव्हते का? मग हा खर्च वेस्टेज का केला?

**मा. महापौर :-**

त्यांनी खूलासा केला कि ते त्यांनी चूकीचे निवडले आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

तूमचे म्हणणे बरोबर आहे हया गोषवाऱ्यामध्ये असा शब्द आलेला आहे. एकूण १५० बसेस पार्किंग, दूरुस्ती तर १५० बसेसच्या दूरुस्तीचे ते वर्कशॉप आहे. १५० बसेस पार्किंग वेगळे १५० बसेस वेगवेगळया ठिकाणी पार्क होतील. १५० च्या १५० दूरुस्तीसाठी एकाच डेपोत जातील आणि एका डेपोमध्ये एका वेळेला ३५ बसेस हया ठिकाणी उभ्या राहू शकतील.

**प्रमोद सामंत :-**

तूम्ही १८ कोटीची मान्यता घेतलेली आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

१४.५०

**प्रमोद सामंत :-**

ही १४.५० आणि अगोदरची वेगवेगळी मान्यता.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

४ कोटी टेम्पररी पार्किंग.

**प्रमोद सामंत :-**

बसेस पार्किंगसाठी १८ करोडची मान्यता झाली.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

नाही. पार्किंगसाठी ४ कोटी डेपोची १४.५० बेरीज तूम्ही करायला लागले आम्ही नाही.

**शर्मिला बगाजी :-**

साहेब तो खर्च आपला वेस्टेज गेलेला आहे कि नाही. कारण ते काम केलेले आहे. तूम्ही पण बघीतले म्हणजे तो वेस्टेज गेला.

**आसिफ शेख :-**

सन्माननीय महापौर मॅडम, सन्माननीय उपायूक्त गणेश देशमूख यांनी याठिकाणी टेम्पररी रोड बसेस उभ्या करण्यासाठी टेम्पररी आणि परमनन्ट बस डेपो बांधायचे आहे. आपल्याला पहिल्या फेजमध्ये १०० बसेस येणार आहेत. हा प्रस्ताव महासभेपूढे आलेला आहे. परंतू आपली भूमिका निश्चित झालेली नाही. १०० बसेस आपण घेतल्या त्या तिथे उभ्या केल्या तर त्या बसेस आपण चालवणार आहेत कि त्याचा ठेका काढून ठेकेदाराला देणार?

**मा. महापौर :-**

सन्माननीय सदस्य हा विषय चालवायचा नाही आहे. हा ठेक्याचा विषय नाही. हा वेगळा विषय आहे. आपल्याला ठराव मांडायचा आहे का?



माहिती अधिकार ... अंतर्गत देण्यात आलेली ... सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**आसिफ शेख :-**

आम्ही तूम्हाला सूचना करतो कि आपली प्रशासनाची भूमिका काय आहे?

**मा. महापौर :-**

विषयाला धरुन बोला.

**आसिफ शेख :-**

एवढे करोड रुपये वाया घालवायचे आहेत का? बसेस कोण चालवणार? स्टाफ भरती केला पाहिजे. ड्राईव्हर, कंडक्टर, क्लार्क, लिपीक पण ती भूमिका क्लियर करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पूढचा विषय घ्या. मी ठराव सर्वानूमते मंजूर करते.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रूवकिशोर पाटील :-**

तूमच्या ठरावाला आम्ही समर्थन देतो, परंतू ऐकून तर घ्या.

**आसिफ शेख :-**

मा.महापौर मॅडम खूलासा करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

महासभा मे प्रस्ताव पास हूआ हे कि चार जगर टेम्पररी शेड बस के लिए बनाने है, उसके लिए आर्थिक, प्रशासकिय मंजूरी भी हो गई। मै जानना चाहता हुं वैसे तो परिवहन का जवाब देने कोई नही है। क्याकि यह विडंबना है। मॅडम बिन बोले हमको मालूम नही। भाईंदर वेस्ट मे प्लाय ओव्हर के निचे एक शेड बनाया हूआ है। पिछले ढाई सालसे वहॉ पे बस खडी है। वहॉ अनैतीक कार्य हो रहा है। वहॉ पे रिपेयरिंग का काम चालू है आजूबाजूके लोग परेशान है। ढाई सालसे कम्प्लेंट कर रहा हूँ। चार टेम्पररी जगह हमने डिसाईड कर दिया या आर्थिक प्रशासकिय मंजूरी हो चूकी थी तो आज तक टेम्पररी कूछ भी क्यू नही किया गया जिसकी वजह से लोगो को जो परेशानी हो रही है। खूद मा.महापौर जाके आयी उन्होने भी देखा।

**मा. महापौर :-**

आपके पास बहोत समय था। पर आप लोगो ने नही किया। यह आप मूझे मत पूछीए।

**सूरेश खंडेलवाल :-**

मॅडम, मै प्रशासन को पूछ रहा हूँ। प्रशासन को एकही कहना है। आपको चार जगह दिया है। टेम्पररी जगह शूरु किजीए और लोगोको राहत दिजीए।

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८७ :-**

आ.क्र. ३२६अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९५ :-**

उपरोक्त प्रकरणानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात सोयीसुविधा करीता महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथे टी. टर्मिनल विकसित करावयाचे आहे. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमात ५० बसेस असून केंद्रशासनाच्या ख्रछछ्न या योजने अंतर्गत १०० बसेस मंजूर झालेल्या आहेत. तरी एकूण १५० बसेस पार्कीग, दुरुस्ती संबंधीत कामकाजाकरीता सोयीसुविधायुक्त असे टी. टर्मिनल नमूद जागेत विकसित करणे गरजेचे आहे. करीता टी. टर्मिनल विकसित करणेकरीता सुमारे रुपये १४.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील काम परिवहन उपक्रमातर्फे चालविण्यात येणाऱ्या बसेस सेवा कार्यक्षम करणेकरीता अत्यावश्यक असून त्यामुळेच परिवहन सेवा सुरळीत चालणार असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा. विशेष महासभा दि. १९/०६/२०१७**

आज सोमवार दि. १९/०६/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी १०.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १४/०६/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | सिंग मदन उदितनारायण | सभागृह नेता |
| ४) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ५) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ६) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ७) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ८) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ९) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ११) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १२) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १३) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १७) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १८) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १९) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २०) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २१) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २२) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २८) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| २९) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३०) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३१) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३२) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३३) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३४) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३५) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३६) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३७) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३८) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ३९) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४०) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४१) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४२) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४४) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४५) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| ४६) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ४७) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ४८) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ४९) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५०) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ५१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५२) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५३) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५४) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५७) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५८) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ५९) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६०) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६३) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६४) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६५) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ६६) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ६७) | सुमबंड महरूनीसा हारूनरशीद | सदस्या |
| ६८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६९) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७०) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७१) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| २) | लियाकत ग. शेख | विरोधी पक्षनेता |
| ३) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| ५) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ६) | मुन्ना सिंग | सदस्य |
| ७) | पाटील वत्सला मन्साराम | सदस्या |
| ८) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ९) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| १०) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ११) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १३) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| १४) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| १५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| १६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| १७) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| १८) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १९) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| २०) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| २१) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| २२) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| २३) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| २४) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (मंत्रालय) व मनपाने संयुक्तरित्या सदर रस्ता तयार करण्याचे निर्देशित केले. |
| ८ | सिमेंट कॉंक्रीट रस्तेकरिता रु.२०० कोटीचे कर्ज एमएमआरडीए कडून मिळणेबाबत. | एमएमआरडीए | एमएमआरडीए चे आयुक्त यांना सिमेंट रस्त्यासाठी २०० कोटी कर्ज ३० जुन पूर्वी मिरा भाईंदर मनपास मंजूर करुन देण्याचे आदेश दिले. |
| ९ | उत्त्न येथे मत्स्यविकास प्रकल्प (फिशरी हब) मंजुरी देणेबाबत. | मत्स्य विकास | उत्त्न येथे मत्स्यविकास प्रकल्प फिशरी हब ५० टक्के केंद्र शासन व ५० टक्के मिरा भाईंदर महानगरपालिका या अनुषंगाने खर्च करुन पशुसंवर्धन विभाग व मा. आयुक्त यांना सदर काम करण्याची मंजुरी देण्यात आली. |
| १० | शहराकरिता मंजुर ७५ एम.एल.डी. योजनेतील उर्वरीत ५० एम.एल.डी. पाण्याच्या विसर्ग (सोडण्याबाबत) | उद्योग व जलसंपदा | मिरा भाईंदर शहरातील पाणी प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असल्याने त्वरीत उर्वरीत ५० एम.एल.डी. पाणी सोडण्यासाठी एम.आय.डी.सी. एरीगेशन विभागास आदेशित करण्यात आले. |
| ११ | सुर्या धरणातून २१९ एम.एल.डी. पाण्याच्या प्रकल्पाचे भुमीपुजन | जलसंपदा | सुर्या धरणातून मिरा भाईंदर शहरास २१९ एमएलडी पाणी देण्याचे नविन योजनेच्या काम ३० जुनच्या आत सदर प्रकल्पाचे भुमीपुजन करण्याचे ठरविण्यात आले व तसेच कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आदेश देण्यात आले. |

मिरा भाईंदर शहरवासियांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, मुलभूत सेवा सुविधा व प्रलंबित विकास कामांची मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सन्मानपूर्वक दखल घेवून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश दिल्याबद्दल सन्मा. सभागृहाच्या वतीने, समस्त् शहरवासियांच्या वतीने मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३२, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे बस डेपो बांधणे भाग-१ कामास संदर्भिय क्र.०१ अन्वये डेपो बांधकामाबाबत मे.ओमकार इंजिनिअर्स अँन्ड कॉन्ट्रक्टर्स, बोरीवली (पू.) यांना देण्यात आलेला असून मौजे घोडबंदर येथे डेपो बांधकाम चालू आहे. सदर ठिकाणी "डिझेल पंप" करीता जागेची तरतूद असून त्याप्रमाणे बांधकाम चालू आहे.

तरी सदर डेपोच्या ठिकाणी डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून प्रत्यक्ष देकार मागवून त्यांना डेपोच्या ठिकाणी डिझेल पंप बसविणेबाबत मंजुरी देणे गरजेचे आहे.

सबब इच्छुक सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील पेट्रोलिअम कंपन्यांकडून देकार मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच घोडबंदर क्र.३२६-अ येथे बस डेपो बांधणे (भाग-२) कमी रु.२२,७२,४४,५००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कामी प्रथम व दुसऱ्या टप्प्याकरीता "भुसंपादन आगार बांधकाम" या लेखाशिर्षाखाली एकुण ३४०० लक्ष तरतुद पुर्नःविनियोजन उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त महोदय ह्या आता परिवहनाच्या ठरावात बहुतेक आर्थिक प्रशासकीय मंजूरी झालेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

टप्पा क्र. दोनसाठी आम्ही आर्थिक प्रशासकीय मान्यता त्या विषयामध्ये दिलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त साहेब असे बरेच प्रकार आपल्या इथे झाले आहेत प्रत्येक विषयाला आपण एका वर्षात २-२,३-३ वेळा अंदाजपत्रक वाढवून काम करून घेतलेली आहेत त्याच त्या ठेकेदाराकडून जे गरज नगसताना



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली साक्षांकित सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

एखादा रस्ता बनवायला घेतला, एक अमूक महापालिकेपासून स्टेशन पर्यत रस्ता बनवायला घेतला. त्याच्यामध्ये अर्ध्या ह्याची आपण पहिली मंजूरी घेतली मग अर्ध्या रस्त्यापर्यत जी मंजूरी घेतलेली आहे. त्यानंतरचे पुढच काम देताना त्याच ठेकेदाराकडून करून घेण्याची गरज नसते आणि अशा प्रकारे ब-याच वेळा विषय नसताना ह्या पूर्ण सभागृहाची दिशाभूल करून आर्थिक प्रशासकीय किंवा अंदाजपत्रकावर वाढीव मंजूरीचा प्रस्ताव समोर आणून त्याची मंजूरी घेतलेली आहे. ते एकदम चुकीचे आहे. त्या विषयावर तुमच फक्त तुम्हाला ह्या गोष्टी सांगायच्या आहेत. विषय कराल तर तो फार मोठा विषय करता येईल परिवहनचा विषय आहे. महापौर मॅडम तुम्ही स्वतः आयुक्त साहेब गेले की नाही माहित नाही. मला तुमच्याकडे एक विनंती आहे की, ज्या ठिकाणी आता आपल्या नविन ४८ बसेस आहेत आयुक्तसाहेब ४८ बसेस आहेत, ४८ बसेस उभ्या आहेत. त्याठिकाणी तुम्ही जाऊन बघाव की त्या नविन बसेसची काय हाल करून ठेवलेली आहे. महापौर मॅडम जवळ जवळ आता तीन महिने झाले आहे. नविन १० बसेस विदाऊट नंबर तिथे पडलेल्या आहेत. त्याचे टायर काढलेले आहेत. दुस-या बसेसला वापरलेले आहेत की चोरी झालेले आहेत मला माहित नाही. त्याचे मिरर नाहीत त्याचे दरवाजे उघडे ठेवलेले आहेत त्याला खाली टायरिंग केलेले नाही. कॉक्रीटीकरण केलेले नाही. त्या चिखलातून त्या बसेस फिरतायेत आणि ज्या जुन्या बसेस आहेत. त्याच्यासाठी आपण ग्रावटींग केले आहे. स्टार बनवले आहेत काय काय करून ठेवल आहे. मग ह्या नविन बसेससाठी मी त्या दिवशी पिंपळे मॅडम गेल्या त्यांना विचारले तुम्ही इथे कॉक्रीटीकरण का नाही केले, आयुक्त साहेब हा जो विषय आहे काल मी बरेच डेपो मध्ये गेलेलो तुमचा विषय बघून की त्या बसेसचे हाल खराब आहेत ते टायर किमान ४८ मधल्या ९ बसेस विदाऊट नंबरच्या चार महिने तसेच पडून आहेत. का पडून आहेत याची कल्पना नाही. त्या बसेसचे टायर तिथेच उभ्या उभ्या खराब होत आहेत अजून पर्यत आपण एन.सी.सी. तत्वावर दिले अजून ते टेंडर बसेस आपण पूर्ण करु शकलो नाही. सहा महिने झालेत साहेब ह्या केंद्रसरकारने गर्व्हमेंट आपल्या अडीचशे बसेस दिलेल्या आहेत त्यांची आपण एवढी वाट लावून ठेवलेली आहे आणि ह्यामध्ये प्रशासनाने कुठेतरी दुर्लक्ष केले असे मला नेहमी वाटते मी आयुक्त साहेबांना नेहमी पत्रव्यवहार केले आयुक्त साहेबांनी मला महापौर मॅडम एकही पत्राचे उत्तर दिलेले नाही. पिंपळे मॅडमकडे गेले त्यांच्याकडे बसलो त्यांच्याकडे उत्तर नाही मी त्या आनंद गबाळे जे आता परिवहन बघतात त्यांच्याकडे सॅटीसफीक विचारला त्यांना माहित नाही. तिकडे त्या डेपोमध्ये लाईट नाही त्या एका डेपोमध्ये आपण जवळ जवळ एक करोड रुपये डेपोच्या कामासाठी खर्च केले आहेत. डेपो आहे, पार्किंग आहे, तुम्ही जे म्हणाल ते पिंपळे मॅडमला विचारले का अस आहे त्यांनी मला स्पष्ट सांगितले की वर्ल्ड बँकेचे नाम प्रमाणे बनवलं आहे वर्ल्ड बँकेने आपल्याला सांगितले आहे का कुठे इथे काँक्रीटीकरण करायचे नाही चिखलामध्ये बसेस उभ्या करायच्या असे वाईट रितीने सांगितले आहे का? इथे परिवहन सेवा उपलब्ध नाही म्हणून लोक वारंवार आमच्याकडे तक्रार करतात पण प्रशासन आणि महापौर मॅडम तुमच्यासमोर पण हा विषय आणला मी जवळ जवळ २० करोड रुपये ही बिल्डींग सोडून आपण पार्किंग आणि डेपो व्यवस्था वरती आपण खर्च केलेले आहेत. तुम्ही ह्या विषयावरती लक्ष द्या आणि प्रशासनाने उत्तर देऊ शकेल तर त्यांनी उत्तर द्याव अशी माझी इच्छा आहे. राऊत साहेबांकडे आहे का म्हणून मगाशी काय काम दिल असे विचारले राऊत साहेबांना मी परिवहनची जबकाबदारी राऊत साहेबांकडे आहे का?

**मा. महापौर :-**

आप से है मंजुरी यह सब सुविधा कह रहे है ना जो नही है वो सब समाविष्ट है दुसरे टप्पे में और इसिलिए मंजुरी ली गई है। हमें आगे करना ही है, कुछ भी रेडीमेड नही है। वी आर डुईंग ग्रेट.

**प्रमोद सामंत :-**

७० लाख रुपये त्याचे ग्राऊंटींग करायला खर्च केले आहेत. त्याचे लाईट लावायला २० लाख रुपये खर्च केले आहेत काय परिस्थिती आहे कोणी तरी जाऊन बघावे कोणीच जबाबदार नाही मला एक्झॅक्ट फिगर माहित पण ४० करोड रुपयेच्या बसेस तिथे उभ्या आहेत.

**मा. महापौर :-**

सेकंड टप्प्याचे काम झाल्यानंतर तिथे काही सगळे व्यवस्थित होणार.

**प्रमोद सामंत :-**

मॅडम ४० करोडचा चुराडा झाला ना. त्याला जबाबदार कोण आहे? तुम्ही, प्रशासन की जनता. कोण जबाबदार आहे त्या गोष्टीला. २०० टायर तिथे पडलेले आहेत. खराब झालेले २०० टायर पडलेले आहेत.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

महापौर महोदया, आपल्या परवानगीने भाष्य करु इच्छितो की सध्यातरी परिवहनचा मला प्रभार आहे. आणि या बाबत परवाच म्हणजे १७ तारखेला त्याचा आढावा घेतला. आपण त्याचा आढावा संदर्भात जे पहिले बोललात त्या संदर्भात अपडेट करु इच्छितो जानेवारी २०१७ च्या दरम्यान ७० टायर अॅपोलो हे सर्व टायर आहेत. ते ट्यूबलेस टायर आहेत. त्याच्यामुळे त्याला काही एअर सिलींग वगैरे, नायट्रोजन सिलींग वगैरे हे सफीशिएन्टली होईल. त्यानंतर रिफ्रेश एजन्सी करुन टायर्स मागविण्यात आले आहेत आणि चार गाड्या टायर्स अभावी उभ्या होत्या त्यापैकी तीन गाड्या निघालेल्या आहेत बाहेर. चार बसेस उभ्या होत्या, परवा शनिवारच्या आधी आणि शनिवारपर्यंत तीन आपल्या बसेस निघालेल्या आहेत. एक बस प्रोव्हेली आज निघेल. त्याप्रमाणे इंजिनच जे आहे देखभाल दुरुस्ती गाड्याची ही कमल मोटर म्हणजे ती अजूनही वॉरंटी अंतर्गत असल्यामुळे जी वॉरंटी अंतर्गत आहे त्याची कमल मोटर करते. आणि त्याचे हिस्ट्री सीट हिस्ट्री रजिस्टर सुध्दा या इंजिनचे हे कमल मोटर कडून मेन्टेन केले जाते जी वॉरंटी आहे ती टोटल १८ महिन्यांची वॉरंटी आहे

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

आणि मी जी चौकशी केली त्यातल्या बऱ्याच बसेस ह्या वॉरंटी अंतर्गत आहेत. १८ महिन्यांची वॉरंटी अजून संपलेली नाही. क्लजप्लेटच्या वगैरे इतर आणि प्रेशर प्लेट आणि बॉस पम्प वगैरे इतर जे काम आहेत ही ओम मोटर शॉप एजन्सीकडून केली जातात. आमचा प्रयत्न हा राहील की लवकरात लवकर ह्या एजन्सीशी कोऑर्डीनेशन करुन ह्या बसेस जास्तीत जास्त रस्त्यावर आणायच्या असा प्रशासनाचा प्रयत्न राहील. धन्यवाद.

**प्रमोद सामंत :-**

परिवहनचा विषय आहे. लोकांचा एकदम निकडीचा विषय आहे. आयुक्त साहेबांनी त्यात आढावा घेतला. सुधिर राऊत साहेबांनी त्याबद्दल सांगितल पण सत्य परिस्थती तुम्ही तिथे जाऊन बघितली. जे आम्ही बघितल ते की नऊ बसेस चार महिन्यापासून तिथे विदाऊट नंबर प्लेट उभ्या आहेत. त्याला काढलेले टायर आहेत त्याचे याबद्दल त्यांनी काही भाष्य केले नाही. ४ बसेस, ६ बसेसचे इंजिन खराब आहेत किंवा मॅनरराईझ काही इश्यू आहेत त्या उभ्या आहेत. त्याबद्दल त्यांनी काही सांगितले नाही कोण त्याची देखरेख करते ते त्यांनी सांगितले पण जे देखरेख करतात ते चुकीच्या पध्दतीने केले आहेत का? त्या तिथे सगळे बसेसचे दरवाजे उघडे आहेत आता मार्च, एप्रिल, मे धुळ उडत असते. हवा चालू असते त्यावेळी सगळ्या बसेसचे दरवाजे उघडे. उभ्या पार्क केलेल्या बसेस संध्याकाळी पाच वाजता, १६-१७ बसेस पार्क केलेल्या होत्या. तिथे म्हणजे १७ बसेस नादुरुस्त होत्या. तुम्हाला फोटो उद्या पाहिजे असेल तर मी तुम्हाला दाखवतो. माझ्याकडे आहे मग त्या १७ बसेस ना दुरुस्त असताना त्याचे दरवाजे बंद करायला आपल्या लोकांना कळत नाही का. त्या धूळ मातीमध्ये उधळलेले इंजिन तशीच तिथे आहेत हे आपल्या लोकांना कळत नाही का? तो पार्किंगचा एरिया कॉंक्रीटीकरण करायला पाहिजे हे लोकांना कळत नाही का? मी ह्या बद्दल विचारतो तुम्हाला त्या त्रुटीबद्दल तुमच्या समोर आणून देतो. त्याबद्दल विचारले तुम्हाला.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

महापौर महोदय, सन्मा. सदस्य यांनी जे उपस्थित केलेले मुद्दे हे रास्त आहेत आणि त्याबद्दल त्वरीत चौकशी आणि पाहणी समक्ष करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. धन्यवाद.

**दिप्ती भट्ट :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते की मैं कमसे कम मी सहा महिने अगोदर एक पत्रव्यवहार केलेला आणि आयुक्त साहेब पण बसलेले आपण पण होते आणि पिंपळे मॅडम ही होत्या तेव्हा मी इथून मिरारोडपासून दहिसर बोरीवली ते कांदिवली वेस्टपर्यंत बसची सुविधा मागितलेली. आपण बोलले की एक्स्ट्रा बस आले की आपण करु. कॉलेजची मुल सकाळी ट्रेन ६.२३ ची आणि ६.३० ची होती. ती डायरेक्ट फास्ट केलेली आहे. मुलांना उतरायला होत नाही. त्याच्यामध्ये मुलांचे ॲक्सीडन्ट पण झाल आणि एकाचा मृत्यू पण झाला. १५ वर्षाचा मुलगा त्या घराची हालत काय आहे ती त्यांना माहिती असेल. आपल्याला प्लीज रिक्वेस्ट आहे की कमीत कमी १५ कॉलेज येतात आणि लोकांसाठी, लेडीजसाठी पण तर प्लीज इथून जर बसचे एवढे सगळे बोलतात बस अशाच पडल्यात. ती गॅरंटी आपण करु म्हणून आपण केअर नाही करणार ती चुकीची गोष्ट आहे. आपण केअर करायला पाहिजे. ते गॅरंटी आहे म्हणून आपण लक्ष नाही देत. ते रिप्लेसमेन्ट भेटतील. साहेब ते उत्तर बरोबर नव्हत आपला. पण रिक्वेस्ट आहे की बसची सुविधा करुन देण्यात यावी.

**अनिल भोसले :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो कमिशनर आपण घोडबंदर टान्झीट कॅम्प या ठिकाणी बस डेपोचे काम तातडीने रात्री झोपडे तोडले होते. या अगोदर साहेब त्या झोपडे तुटलेत त्या ठिकाणी वॉल कम्पाऊंडचे काम अद्याप झालेले नाही. त्याठिकाणी त्या मुलाचे त्या हौदयामध्ये एकाचा हात मोडला ह्या विषयासाठी महापौर मॅडम आपल्याकडे त्या दिवशी कमीत कमी शंभर लोक घेऊन आलो होतो. एका मुलाचा हात मोडला. एक बाथरुम बांधायला घेतले आहे. त्या बाथरुममध्ये गेली ४ महिन्यापासून बाथरुमचे काम चालू आहे. एक महिला त्या दिवशी पडली तिचा हात फ्रॅक्चर दोघांचे हात एक मुलाचा एक महिलेचा हात मोडलेला आहे आणि अद्यापी अनेक वेळा सांगुन सुदा कमिशनर आपण त्या दिवशी बाहेर होतात. मी बारकुंड साहेबांना येऊन भेटलो होतो. पण तिथे कुठलेच काम झालेले नाही. त्या ठिकाणी एक लाईटचा पोल लावला. तो पोल सुध्दा चालू झाला नाही. ज्या ठिकाणी वॉल बांधली गेलेली आहे. बांधलेल्या वॉलच्या बाजूला माती टाकण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरला जो ठेकेदार आहे त्याला मी स्वतः जातीने जाऊन सांगुन सुध्दा त्या ठिकाणी माती सुध्दा टाकण्याचे काम केलेले नाही. आपले तातडीचे काम म्हणून त्याठिकाणी कमीत कमी ३० ते ४० लोकांनी रातोरात मध्ये घरे तोडली आणि ह्या कामाला जवळ जवळ दोन महिने झालेले आहेत. अद्याप त्या ठिकाणी कुठलेच काम झाले नाही. साहेब ह्याला जबाबदार कोण? ठेकेदार की कोण? दोन माणसांचे हात तुटले एक महिलेचा एक लहान मुलाच आणि होऊन बारकुंड साहेबांना सांगुन सुध्दा ते काम आणखी चालू झाले नाही. कारण ह्या विषयावर संदर्भात आपल्याला मी तीन वेळा फोन केला पण आपण तीन वेळा मंत्रालयामध्ये होतात. आपण सांगितले की बारकुंड साहेबांना भेटा काम होईल पण काम नाही झालेल आणि त्या दिवशी सांगुन सुध्दा त्या महिलेचा परवाच्या दिवशी ती महिला पडली. तिथे लाईट नाही, बाथरुम आहेत त्याला दरवाजे नाहीत महिला त्या ठिकाणी. एखादा चर्सी, बेवडा असे म्हणजे अनेक दोन्ही त्या ठिकाणी राहतात. एखादी तक्रार जर झाली ह्यासाठी सिरियसली घ्यायला पाहिजे असे माझे मत आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

आपण जी काम सांगितली होती त्यापैकी काम झालीत. आपली आता सभा संपली. मी स्वतः आणि तुम्ही आपण दोघेजण जाऊन त्या स्पॉटला आणि तुम्हाला जे-जे झालेली काम आहेत. ते आपण बघुया. आपण दोघ जॉईंटली जाऊया. महासभा संपली की जाऊ.

**अनिल भोसले :-**

म्हणजे महासभेत बोलतो ते असेच बोलले नाही ना. मी कमिशनर साहेबांना बोललो आपण मंत्रालयामध्ये होतात. आपण बोलले होतात. त्यांच्याकडे जा त्यांच्याकडे मी एकटा आलो नाही. शिष्टमंडळी घेऊन कमीत कमी शंभर लोक आलो होतो. त्या ठिकाणी तरीही काम झालेले नाही. त्या कंत्राटदाराला जाऊन भेटलो, तीन वेळा भेटलो. अर्धा वॉलचा काम झालेला अर्धा वॉलचा काम तसेच बाकी आहे.

**जयमाला पाटील :-**

मॅडम आता शाळा कॉलेज सुरु झाल्यानंतर मोर्वा ते स्टेशनपर्यंत बस सेवा रेग्युलर नाही तर ती व्यवस्थित बस सेवा करावी अशी आपल्याला विनंती.

**मा. महापौर :-**

यांची सूचना घेऊन घ्या. आपण एक सत्कार यांच्यासाठी घ्या.

**जयमाला पाटील :-**

साहेब महासभेला विषय आहे की मागच्या महासभेमध्ये एक विषय होता की टेंबा हॉस्पीटलमध्ये डे नाईट पी.एम. ची सेवा उपलब्ध करावी. आणि ती आपण उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी महासभेचे धन्यवाद मानते.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम माझ्या वॉर्डमध्ये एक इगल चार्ज मॅनहोल में गीर गया। जो स्नेहांजली के पास से नाला जार रहा है। च्द्ध क्ष ध्ङ्घ्म ध्ण्ड्ढ्य द्यङ्घथ्थ्त्दढ़ न्न्दृद्ब द्यण्ड्ढ्य त्ध्र ड्ढङ्घड्ढ्ढ्यद्यड्डथ्ड्ढ ड़दृदड्ढत्द्यत्दृद द्यदृड्ढङ्क त्ध्र ड्ढड्ढ़त्त दृदड्ड ड्ड ढड्डथ्थ्ड्डद ड्डदृध्द. झ्दृद्बदढ़ ड्दृ द्रथ्ड्डन्न्दढ़ ड़द्धत्ड़त्ड्डद्य दृद ढ़्द्धदृद्बदड्ड ड्डदड्ड ड्ड ढ़दृत्दढ़ ण्दृश्ड्ड त्ध्र द्यण्त्ध्र त्ध्र श्ड्ढदद्बड्ढ्थ श्ड्ढढद्य थ्त्ध्रड्ड ड्डदड्ड द्यण्ड्ड ढड्ढत्थ ड्डदृध्द त्ध्र श्ड्ढदद्बड्ढ्थ. यह जो विषय हमने बोला था स्थायी समिती मे लेने के लिए बाकी सब के लिए है। हमने जो रिजाईन किया था की इसका बोला इमरजन्सी है। यह नही लिया हुआ है। इस्टीमेट रेडी है तो भी नही लिया है।

**प्रकरण क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेबाबत.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे बस डेपो बांधणे भाग-१ कामास संदर्भिय क्र.०१ अन्वये डेपो बांधकामाबाबत मे.ओमकार इंजिनिअर्स अँन्ड कॉन्ट्रक्टर्स, बोरीवली (पू.) यांना देण्यात आलेला असून मौजे घोडबंदर येथे डेपो बांधकाम चालू आहे. सदर ठिकाणी "डिझेल पंप" करीता जागेची तरतूद असून त्याप्रमाणे बांधकाम चालू आहे.

तरी सदर डेपोच्या ठिकाणी डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून प्रत्यक्ष देकार मागवून त्यांना डेपोच्या ठिकाणी डिझेल पंप बसविणेबाबत मंजुरी देणे गरजेचे आहे.

सबब इच्छुक सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील पेट्रोलिअम कंपन्यांकडून देकार मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

तसेच घोडबंदर क्र.३२६-अ येथे बस डेपो बांधणे (भाग-२) कमी रु.२२,७२,४४,५००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कामी प्रथम व दुसऱ्या टप्प्याकरीता "भुसंपादन आगार बांधकाम" या लेखाशिर्षाखाली एकुण ३४०० लक्ष तरतुद पुर्नःविनियोजन उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दालमिया स्कूल शिकर ब्रिजेस हिंगार हे एस.एस.सी. मध्ये ९८.४ एवढे टक्के मिळवून सहाव्या रॅन्कमध्ये आलेले भारतामधून आणि आय.सी.आय.सी. बोर्डातून प्रथम आलेले ठाणे जिल्ह्यातून तर त्यांचे सत्कारासाठी मी त्यांना डायसवर बोलवतो.

**मा. महापौर :-**

विषय सगळेच संपलेले आहेत. आता निरोप समांरभ ज्यांना ज्यांना जे काही मनोगत मांडायचे आहे त्यांना मी वेळ देते त्यांनी त्यांचे मनोगत मांडावे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

**दिप्ती भट्ट :-**



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०८/११/२०१७**

आज बुधवार दि. ०८/११/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. २७/१०/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ५) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ७) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ८) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ९) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १४) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १५) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २३) | जैन गीता भरत | सदस्या |
| २४) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २५) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २६) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| २७) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| २८) | रकवी वैशाली गर्जेद्र | सदस्य |
| २९) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३०) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३१) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३३) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३४) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३५) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३७) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३८) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| ३९) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४०) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४१) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४२) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४३) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४४) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४५) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४६) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४७) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४८) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४९) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५०) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५१) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५४) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५५) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५६) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६१) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६२) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६५) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६६) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६७) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६८) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७१) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७२) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७३) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७४) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७६) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७७) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७८) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७९) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८०) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ८१) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८२) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८४) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

८५) म्हात्रे नयना गजानन सदस्या
८६) भानुशाली वर्षा गिरधर सदस्या
८७) म्हात्रे विनोद काशिनाथ सदस्य
८८) गोविंद हेलन जॉर्जी सदस्या
८९) बगाजी शर्मिला विन्सन्ट सदस्या
९०) बांड्या एलायस दुमिंग सदस्य

गैरहजर सदस्य -

१) सिंग श्रीप्रकाश जिलेदार सदस्य
२) जैन सुनिता रमेश सदस्या
३) जैन राजेंद्र भवरलाल सदस्य
४) रॉड्रीकस मोरस जोसेफ सदस्य

रजेचा अर्ज -

१) म्हात्रे परशुराम पदमाकर सदस्य

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौरांना विनंती करतो की त्यांनी पिठासीन व्हाव आणि सभेचे कामकाज सुरु करावे. सर्व सन्मा. सदस्यांना माहिती देतो की एका विषयावर महापौर दालनामध्ये आयुक्त, महापौर यांची मिटींग सुरु आहे. त्यामुळे आपले कामकाज आपण चालु करुया.

**अशरफ शेख :-**

काका महत्वाची महासभा आहे आणि ह्या महासभेमध्ये तुम्ही मिटींग ठेवत आहेत.

**रोहिदास पाटील :-**

महासभेच्या संबंधित विषय आहे.

**अशरफ शेख :-**

१५ मिनिटे तहकुब करा ना. येऊ दे त्या लोकांना १५ मिनिटे आपण तहकूब करु.

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेमध्ये सन्मा. महापौर आलेले असले तर आपल्याला १५ मिनिटे सभागृह तहकुब करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

तहकुब करायचा प्रश्न येत नाही.

**अशरफ शेख :-**

काका आम्ही थांबायला तयार आहोत.

**अनिल सावंत :-**

महापौर आलेले आहेत, आयुक्त आलेले आहेत सभागहासंबंधित विषयाची मिटींग आहे म्हणता मग सभागृहाच्या सदस्यांना कळायला पाहिजे ना कुठची मिटींग आहे काय आहे. मिटींग चालु करायला म्हणता. विषय कुठला आहे ह्या सभेपेक्षा मोठा विषय आहे का?

**रोहिदास पाटील :-**

ह्या सभेपेक्षा मोठा विषय नाही.

**अनिल सावंत :-**

सभा सुरु करायला पाहिजे महापौरांचा अपमान करत आहोत. तुम्ही मा. महापौर आलेले आहेत. इमारतीमध्ये त्यांनी येऊन सभा चालु करायला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

असे आहे की आजच्या सभेपुढे अत्यंत महत्वाचे कामकाज आहेत. महापौर मॅडम ह्या प्रिमायसेसमध्ये आहेत आणि मिटींग त्याच चालु करणार होत्या थोड्या वेळाने ते येतील प्रश्न असा आहे की ह्या सभागृहाच्या सन्मा. सदस्या नयनाताई म्हात्रे यांच्याकडे सफाई कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छतेवरुन काहीतरी विवाद झाले आणि त्यांच्या विरोधात अत्यंत घृणास्पद अशी भाषा वापरली गेली ह्या संदर्भात नयनाताई म्हात्रे यांनी तक्रार दाखल केलेली आणि त्या तक्रारीला अनुसरुन त्या कर्मचाऱ्याला इथुन हटविण्याचे धोरण ठरविण्यांत आल आयुक्तांकडे ते प्रकरण गेल आणि अशा वेळेला श्रमजीवी संघटनेच्या युनियनने ह्या शहरामधल्या संपूर्ण साफसफाईचे कामकाज बंद केलेले आहे. आणि हे कामकाज त्यांनी बंद केलेले आहे. श्रमजीवी संघटनेचे सन्मा. अध्यक्ष विवेक पंडित साहेब आलेले आहेत. भाऊ आलेले आहेत आयुक्त साहेब महापौर मॅडम आणि विवेक पंडित साहेब यांची चर्चा सुरु आहे. ही चर्चा संपली ह्या कामातुन तोडगा निघाला की पुढचे कामकाज त्या करणार आहेत. म्हणून आजच्या सभेचे कामकाज सुरु करावे असे सचिवांना विनंती करतो.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र.** ३२६-**अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता** HSD **सह** Bio-Diesel **मिश्रीत डिझेल** (Mixture of EURO-IV STD **करिता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत**.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय मिनिट्स येतील ह्या इतिवृत्तांमधील ह्या विषयाचे. आम्ही तुम्हाला थोबवायचा प्रयत्न केला. शिस्तभंगाची कारवाई तुमच्यावर होईल.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्याकडून देकार मागविणेस मा.महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार HSD Confirming to specification No. as per Is १४६०/२००५ (5th revision) प्रकारचे डिझेल पुरवविण्यासाठी शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

तथापि, Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल करीता देखील देकार मागविणे आवश्यक आहे. Bio-Diesel हे पर्यावरण युक्त असल्याने प्रदुषणामध्ये घट होणेस मदत होऊ शकेल. हाई स्पीड डिझेल मिश्रीत Bio-Diesel विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय यांचेकडील अधिसूचना दि.१० ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार रेल्वे, राज्य परिवहन उपक्रम व किमान आवश्यकता १२००० लिटर्स असणाऱ्या उपभोक्त्याला Bio-Diesel वापरासाठी परवानगी मिळू शकते. सदर अधिसूचनेनुसार शासकीय पेट्रोलियम कंपन्या, खाजगी Bio-Diesel उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते व केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संयुक्त कंपनी इ. द्वारे पुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे.

**ठराव :-**

मा. महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये मंजुरी दिल्यानुसार शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून HSD डिझेलसाठी देकार मागविणेबाबत Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD) करीता देखील देकार मागविणेबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी तपासून निविदा मागविण्यांत याव्या. जे डिझेल मनपाच्या वाहनांसाठी फायदेशीर व योग्य असेल त्याच निविदा स्विकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांना मी विनंती करत आहे. तुम्ही सगळे बसून जा. शांततेत सभा चालु द्या. तुम्ही चुकीच केलेले आहे. तुम्ही बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही शांततेत बसा. पक्षांना नाही करायचे आहे तर का करु. सन्मा. सदस्यांनी बसून जा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तशी कायद्यात प्रोव्हिजन नाही. स्थगितीला प्रोव्हिजन नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सगळ्यांनी बसून घ्या. शांततेने निर्णय घेऊ. निर्णय आल्यावर डिक्लेयर करु. प्रविण पाटीलजी तुम्हाला एवढी काय घाई आहे. शासन निर्णय आल्यावर निर्णय घ्या.

**मा. उपमहापौर :-**

दोन दिवसाचा प्रश्न आहे मत मागितले आहे. आम्ही काही चूकीचे करतो का?

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पूढचा विषय घ्या. आप लोक अपने जगह पर बैठ जाईए यह लास्ट वॉर्निंग है।

**प्रकरण क्र. २६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र.** ३२६-**अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता** HSD **सह** Bio-Diesel **मिश्रीत डिझेल** (Mixture of EURO-IV STD **करिता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत**.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.३२६-अ) येथे डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्याकडून देकार मागविणेस मा.महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार HSD Confirming to specification No. as per Is १४६०/२००५ (5th revision) प्रकारचे डिझेल पुरवविण्यासाठी शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

तथापि, Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल करीता देखील देकार मागविणे आवश्यक आहे. Bio-Diesel हे पर्यावरण युक्त असल्याने प्रदुषणामध्ये घट होणेस मदत होऊ शकेल. हाई स्पीड डिझेल मिश्रीत Bio-Diesel विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय यांचेकडील अधिसूचना दि.१० ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार रेल्वे, राज्य परिवहन उपक्रम व किमान आवश्यकता १२००० लिटर्स असणाऱ्या उपभोक्त्याला Bio-Diesel वापरासाठी परवानगी मिळू शकते. सदर अधिसूचनेनुसार शासकीय पेट्रोलियम कंपन्या, खाजगी Bio-Diesel उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते व केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संयुक्त कंपनी इ. द्वारे पुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे.

**ठराव :-**

मा. महासभा ठराव क्र.३१ दि.१९/०६/२०१७ अन्वये मंजुरी दिल्यानुसार शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून HSD डिझेलसाठी देकार मागविणेबाबत Bio-Diesel (ए-१००) मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD) करीता देखील देकार मागविणेबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी तपासून निविदा मागविण्यांत याव्या. जे डिझेल मनपाच्या वाहनांसाठी फायदेशीर व योग्य असेल त्याच निविदा स्विकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. गिता जैन  अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात गोंधळ)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २७, अपंग कल्याण योजना धोरण निश्चित करणे व मतिमंद विद्यार्थ्यांकरिता शाळा सुरु करणेबाबत.

**मा. उपमहापौर :-**

आपणा सर्वांना विनंती करण्यांत येते जे ऐकण्याच्या मनस्थितीत आहेत त्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये "अंध व अपंग कल्याण" या लेखाशिर्षकाखाली विविध योजना राबविणेकामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१ कोटीं इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सन २०१७-१८ या वर्षापासुन मिरा भाईंदर क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

**१) अंपग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
|---|---|
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १० वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा दाखला.(भाडेतत्त्वावर असलेबाबतचा करारनामा)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र. |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त अपंग धारकांसाठी असेल.<br>२) स्टॉल लाभार्थ्यांला परवाना मिळालेनंतर प्रत्येकी रु.२५,०००/- रक्कम महानगरपालिका अपंग कल्याण विभागकडून व्यवसायाकरीता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.<br>३) प्रभाग निहाय स्टॉलची संख्या, त्या प्रभागांच्या लोकसंख्येच्या |



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created byDK/PP

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/९/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २५/०९/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ६. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ७. | श्री. विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ९. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ११. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| १२. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १३. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १४. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १६. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ७८, दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**रवि व्यास :-**

दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created byDK/PP

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामाचे देयक प्रदानास व मुदतवाढीस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ७६ :-**

वरील गोषवारा पाहता प्रशासनाने सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिलेली आहे. या ४ वर्षात कोणत्या जाचक अटीमुळे ठेकेदाराने निविदा भरल्या नाहीत याचा खुलासा करावा. तसेच जर ४ वर्षात निविदा जाचक अटीमुळे कुणी भरत नव्हते तर त्या बाबत प्रशासनाने मा. स्थायी समिती अथवा मा. महासभे समोर ठेवुन त्यातील अटी का शिथील केल्या नाहीत, याबाबत खुलासा करणे गरजेचे असल्याने सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, **महानगरपालिकेच्या विवीध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.**

**मा. सभापती :-**

हा विषय दिला होता त्याचे टेंडर ओपनिंग केल्यानंरत जो मिनीमम वेजेस ॲक्टचा जो कॉलम आहे. त्याच्यामध्ये क्लेरीफिकेशन व्हायचे बाकी आहे. म्हणून महापालिकेनी कामगार आयुक्तांना पत्र दिले आहे. क्लेरिफिकेशन झाल्यावर विषय क्र. ९१ आणि विषय क्र. १०४ परिवहन उपक्रम हे दोन विषय आपण पेंडींग ठेवू या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता आरक्षण क्र. 326-अ येथे विकसीत होत असलेल्या घोडबंदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारणेकरिता प्राप्त देकार स्विकारणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ (घोडबंदर) येथे बस डेपो विकसित करण्यात येत आहे. सदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेस मा. महासभा ठराव क्र.३१ दि. १९-०६-२०१७ व ठराव क्र. २३ दि. ०८-११-२०१७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर कामी Request For Expressions of interest (REOI) प्रसिध्द करणेस मा. आयुक्त यांनी दि. ०५-०१-२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/परिवहन/२९३/२०१७-१८ दि. ०९-०१-२०१८ अन्वये REOI प्रसिध्द करून देकार (Offer) मागविण्यात आले होते. मुदतीत दि. २३-२-२०१८ पर्यंत १) मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. २) मे. अदनानएक्सपोर्टस एण्ड इम्पोर्टस या दोन देकार (Offer) प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त देकारांमध्ये मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेशी वेळोवेळी सल्लागार व अधिकारी यांनी चर्चा करण्यात आली आहे. तसेच मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडून Email द्वारे सादर केलेले सुधारीत प्रस्ताव व स्पष्टीकरण विचारात घेवून मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. हे Eligible Criteria मध्ये पात्र आहेत. मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडे Retail Outlet करीता विचारणा करण्यात आली होती. तथापि, घोडबंदर बस डेपो येथे Retail Outlet Suitable होत नाही. त्यामुळे मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे Consumer Pump करीता आलेला सुधारित देकार (Offer) स्विकारणे योग्य आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. | Name of the | Discounr per liter | Additional discount perliter in Rs. | GST | Trasporta | Payment |
|---|---|---|---|---|---|---|



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी नगरसचिव विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका

| No. | firm | average in Rs. | | | tion Charges | Terms |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Bharat Petroleum Corporation Ltd. | 2.30 (1.99 to 2.62) | 0.25 for Annual consumption upto 4000KL andRs.0.35 for 4000KL | Nil | Nil | One day credit |

घोडबंदर बस डेपो येथे डिझेल पंप उभारणेसाठी मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वरीलप्रमाणे सुधारीत देकार स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता आरक्षण क्र. 326-अ येथे विकसीत होत असलेल्या घोडबंदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारणेकरिता प्राप्त देकार स्विकारणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ (घोडबंदर) येथे बस डेपो विकसित करण्यात येत आहे. सदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेस मा. महासभा ठराव क्र.३१ दि. १९-०६-२०१७ व ठराव क्र. २३ दि. ०८-११-२०१७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर कामी Request For Expressions of interest (REOI) प्रसिध्द करणेस मा. आयुक्त यांनी दि. ०५-०१-२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/परिवहन/२९३/२०१७-१८ दि. ०९-०१-२०१८ अन्वये REOI प्रसिध्द करून देकार (Offer) मागविण्यात आले होते. मुदतीत दि. २३-२-२०१८ पर्यंत १) मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. २) मे. अदनानएक्सपोर्टस एण्ड इम्पोर्टस या दोन देकार (Offer) प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त देकारांमध्ये मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेशी वेळोवेळी सल्लागार व अधिकारी यांनी चर्चा करण्यात आली आहे. तसेच मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडून Email द्वारे सादर केलेले सुधारीत प्रस्ताव व स्पष्टीकरण विचारात घेवून मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. हे Eligible Criteria मध्ये पात्र आहेत. मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडे Retail Outlet करीता विचारणा करण्यात आली होती. तथापि, घोडबंदर बस डेपो येथे Retail Outlet Suitable होत नाही. त्यामुळे मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे Consumer Pump करीता आलेला सुधारित देकार (Offer) स्विकारणे योग्य आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the firm | Discounr per liter average in Rs. | Additional discount perliter in Rs. | GST | Trasport ation Charges | Payment Terms |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Bharat Petroleum Corporation Ltd. | 2.30 (1.99 to 2.62) | 0.25 for Annual consumption upto 4000KL andRs.0.35 for 4000KL | Nil | Nil | One day credit |

घोडबंदर बस डेपो येथे डिझेल पंप उभारणेसाठी मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वरीलप्रमाणे सुधारीत देकार स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१३

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७५ )** :- घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय/ आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-5-13-14 DK SG 21

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/८/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ७५ )** :- घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय/ आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ७९ )** :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री. बर्नड डिमेलो

**अनुमोदन :-** श्रीम. शर्मिला बगाजी

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सभापती**
**स्थायी समिती**

PC5/ 13-14/DK/ ST-18

Created bySC/PP

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २८/०८/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. २२/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| ३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| ६. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोसकर | सदस्य |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | सदस्या |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १३. | डॉ. रमेश जैन | सदस्य |
| १४. | श्री. संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १५. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| १६. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, सदस्या तसेच अधिकारी कर्मचारी वर्ग यांचे स्वागत. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०८/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. २२/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांच्या वतीने आज आपल्या महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त शितोळे साहेब यांचा वाढदिवस आहे. तर त्यांना सर्व सदस्यांनी येऊन पुष्पगुच्छ द्यावे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. या ठिकाणी पाच नंबरचे प्रभाग अधिकारी दिसत नाही.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

खेत्रे हे कोर्ट केससाठी ठाण्याला गेले आहेत. आणि नरेंद्र चव्हाण हे आजारी आहेत.

**प्रशांत दळवी :-**

खेत्रे ने तसे राईटींगमध्ये कळवल आहे का? कुठल्या कारणासाठी गेलेत?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मला त्यांनी एस.एम.एस. केला होता. त्यांनी सांगितल की, सभापती साहेबांना पूर्वकल्पना द्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त साहेब, प्रत्येक वेळा बघितलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांना कोर्टाच वॉरन्ट निघालेले आहे. हे अधिकारी निष्काळजीपणा करतात. कोर्टात वेळेवर हजर राहत नाही. आणि स्टँडींग कमिटी आली की ते गैरहजर राहतात.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created bySC/PP

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रतिमहा रु. | एकुण रु. | ११ महिनेसाठी एकुण रु. |
|---|---|---|---|---|---|
| ४. | वैद्यकीय अधिकारी | ०१ | ३८,०००/- | ३८,०००/- | ४,१८,०००/- |
| ५. | अधिपरिचारीका | १३ | २०,०००/- | २,६०,०००/- | २८,६०,०००/- |
| ६. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ९,०००/- | १८,०००/- | १,९८,०००/- |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १४/०९/२०१३ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०४/०६/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २१/०७/२०१३ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | १४/०९/२०१३ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २०/०७/२०१३ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २०/०७/२०१३ |

तरी वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील अकरा महिन्यांकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मुदतवाढीस तसेच क्ष-किरण तंत्रज्ञ ११ महिन्याकरीता ठोक मानधनावर घेण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

प्रकरण क्र. ७५, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**शर्मिला बगाजी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

खडीकरण करायच म्हणजे याच स्वरुप काय असेल?

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहितीची सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created bySC/PP

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, जे आपल्याकडे २१,४०० स्क्वेअर मी. जागा ताब्यात आले आहे. त्यापैकी १२० मी. X ५६ मी. ची जागा आहे. त्याच्यावर आपण डब्ल्यू.एम. करतो. म्हणजे तिकडे जी भरणी केलेली आहे. त्याच्यावर ट्रक मोठे उभे राहणार. तर २ लेयर स्क्रोलिंग करुन खडीकरण करतो. त्या ठिकाणी एस.पी. साहेब स्वतः आले होते. मा. महापौर मॅडमकडे मिटींग झाली. त्यावेळेला अस ठरल की, शहरामध्ये जे रात्री वाहन उभे राहतात ट्रक वैगेरे टेम्पो वैगेरे ते कुठेच उभे नाही करायचे. फक्त ह्याच ठिकाणी उभे करायचे. तर पोलिसांनी सांगितल की, तुम्ही आम्हाला १२ X १२ चे २ रुम बांधुन द्या. तिकडे आमचे कायमचे पोलिस राहतील आणि आपल्याकडून २-२ पाळीत सुरक्षा रक्षक द्यायचे आहेत. अस झाल ते.

**शरद पाटील :-**

माती भराव करणार होते ना?

**दिपक खांबित :-**

माती भराव केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे जे पार्कींग करणार त्या पार्किंगला काही चार्ज करणार की नाही? आपल्याला उत्पन्नाच काय साधन आहे की नाही? ह्याच्यामध्ये तुम्ही उल्लेखच नाही केला. ह्याच्यामधुन आपल अपेक्षित उत्पन्न काय आहे? जशी लोकांची सोय झाली पाहिजे. गाडी वाल्यांची सोय झाली पाहिजे तर महापालिकेच आर्थिक उत्पन्नाची बाजु काय? त्याला आपण चार्ज लावणार काय करणार? अन्य ठिकाणी ज्या-ज्या ठिकाणी पार्कींग लॉट आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

काका, कस आहे ते, आता आपण टोचण लावुन त्या गाड्या उचलल्या जातात. त्या ठेवण्यासाठी आपल्याला जागा नाही. आणि शहरामध्ये जेवढे आरक्षित जागा आहे. त्या आपण डी.पी. प्लॅनमध्ये काम करायची आहे. जिथे-जिथे ज्या कामासाठी जमिनी जे आपण आरक्षित ठेवलेले आहेत. ते आपल्याला प्रत्येक काम करायची आहे. माझा तर त्यावर उलट प्रश्न आहे. अजुन किती जमिनि डी.पी. प्लान मध्ये आलेल्या आहेत. त्या जमिनि लवकरात लवकर ताब्यात घेऊन ज्या-ज्या प्रक्रिया करतील ते शहरामये अन्य गोष्टी व्हायला पाहिजे. नगरपालिकेची महानगरपालिका झाली प्रत्येक वेळेला आपण हे करुन कामाला गती मिळत नाही. म्हणून प्रत्येक वॉर्डात जमिनी आरक्षित आहेत त्या ताब्यात घेऊन गार्डन असो, शाळा असो, वाहनतळ सांगितल त्या प्रत्येक गोष्टी लवकरात लवकर व्हायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

३६५ जागा सगळी ती जागा ताब्यात घ्यायची आहे ते घेत नाही अजुनपर्यंत आपण आणि आता काकांनी जस सांगितल की, आम्ही एवढा खर्च करतो तर इन्कम सोर्स पण नको? आज टोलनाके बसतात. आज महाराष्ट्र गव्हरमेंट खर्च करते, कुठल्या कंपनीला टोल देते त्यांच्याकडून पैसे वसुल करतात.

**बर्नड डिमेलो :-**

करु ना. सोयी सुविधा केल्यानंतर करु काय घ्यायच काय नाही? पहिला जागा तर उपलब्ध होऊन द्या.

**रोहिदास पाटील :-**

बी.ओ.टी. तत्वावर लोक डेव्हलप करतात. त्याचे चार्जेस घेतात. आपण का .............

**दिपक खांबित :-**

काका, ह्या बाबतीत कस आहे की, पॉलिसी करायची काम सुरु आहे. कुठल्या गाड्यांकडून किती पैसे घ्यायचे. त्याच दरपत्रक ठाण्यामधुन मागवल आहे.

**शरद पाटील :-**

तसा विषय आणा ना.

**प्रमोद सामंत :-**

काका या ठरावात घ्यायची गरज नाही. ही सुविधा जी लोकांना द्यायची आहे त्याच हे काम करुन घेऊ. आणि तसा सविस्तर प्रस्ताव पुढच्या मिटींगमध्ये आणा की हे काम झाल्यानंतर आपण कस रेव्हेन्यू ...............

**शरद पाटील :-**

लोकांना सुविधा देणार आहोत म्हणजे आपण नक्की कोणाला सुविधा देणार आहोत?

**प्रमोद सामंत :-**

ट्रकसाठी रस्त्यावर जे ट्रक उभे राहतात. त्यांना एका ठिकाणी पार्क करण्यासाठी व्यवस्था आहे ही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, आता अन्य राज्यातुन मिरा भाईंदर हे व्यापाऱ्याच शहर आहे. आणि भरपूर माल घेऊन येणारे ट्रक आहे. शहरामध्ये कुठे ही येऊन गाड्या लावतात. त्याने आपल्या नागरिकांना त्रास होतो. आता जी आरक्षित जागेत आपण वाहनतळ करणार आहोत. प्रत्येकाला तिथे वाहन ठेवण्यासाठी जागा होईल. वाहन खाली झाल्यानंतर तिथे वाहन ठेवला तर तिथे तो व्यवहारामध्ये मोकळा होईल. ह्या प्रकारचा वाहनतळ शहरामध्ये पाहिजे. शहरामध्ये कुठेही लावतात. परिवहन विभागाला म्हणा, ऑटोरिक्षावाल्याला म्हणा किंवा नागरिकांना म्हणा जो त्रास होतो त्याच्यापासुन ..........................

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created bySC/PP

**दिपक खांबित :-**

साहेब, मा. महासभेपुढे सादर करतो.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, यह जो काम करते है और जहाँ-जहॉ काम करते है हर जगह से ट्रान्सपोर्ट पैसे देते है। उसमें डब्ल्यू.पी.एम. पी.एम. सब निकलता है। और कही कही घरो की भरणी होती है। वहाँ पर कई घरो के रॅबिट का सामान भरणी करते है। जितना सामान निकलता है उसका हम निकालके चला जाता है, और यहाँ भरणी का पैसा लेते है, तो क्या जो निकलता है उसको नया भरणी युज कर सकते है क्या?

**दिपक खांबित :-**

भरणी हुई नहीं है।

**राजेंद्र जैन :-**

सालभर में हम कितनी भरणी करते है? कितने प्रस्ताव ऐसे आते है जो भरणी का पैसा देते है। अगर हम प्लानिंग करे और वह सब पैसा हम टाईम से पहले प्लानिंग करले की, यहाँ-यहाँ भरणी करनी है तो मेटल ट्रान्सफर को भी दे सकते है ना।

**दिपक खांबित :-**

भरणी हम लोग कही भी महानगरपालिका नही करती जहाँ भी करती है फ्री में करती है।

**प्रमोद सामंत :-**

यह भरणी नही स्क्रालिंग है।

**राजेंद्र जैन :-**

आपने बोला ना डब्ल्यू.पी.एम. डालेंगे।

**दिपक खांबित :-**

डब्ल्यू.पी.एम. पत्थर है।

**राजेंद्र जैन :-**

खडी बहुत निकलती है।

**दिपक खांबित :-**

मट्टी हम कही से भी खरीद के नही लाते है जो फ्री में मिलती है बॉम्बे से आती है, सब जगह से आती है वही डलवाते है।

**राजेंद्र जैन :-**

साहब, डब्ल्यू.पी.एम. ३ मीटर से निकलता है। अभी हमारे यहाँ काम चल रहा है। जगह जगह पे ढेरा लगा है। वह सारा साईड पे पडा रहता है। वह लेके जाते है। मैंने पुछा उनको की, यह युजकर सकते है तो हम यूज करते है। पैसा आपको देते है लेकिन उसीको यूज करते है। निकालने के पैसे देते है उसको।

**दिपक खांबित :-**

उसको कन्टीन्यू नहीं रहता है।

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, वाहन तळाच झाल. आपल्या शहरामध्ये अजुन पर्यंत आपल्याला विकसित करण्याची आणि डी.पी. प्लान म्हणून जे आरक्षित आहे ती कोणती कोणती आहे ते सांगा.

**प्रमोद सामंत :-**

त्या गोषवाऱ्यांमध्ये त्याच प्रोव्हिजन लिहीत जा. बऱ्याच वेळा अस होत आपण प्रोव्हिजन लिहित नाही.

**राजेश वेतोसकर :-**

माझी पण सुचना आहे. हा वाहन तळचा विषय आहे ना. अस टेम्पररी वाहनतळ आपण करु शकतो का नवघर रोड परिसरात?

**दिपक खांबित :-**

होते ना. नवघर कॉलेजच्या समोर मैदान तलावाच्या बाजुला आहे. तिथे सगळे मातीचे ढिगळे झाले. ती माती काढतो तिथे लेवल करतो.

**राजेश वेतोसकर :-**

आमच्या इथे आरक्षित जागा आहे. १११ मध्ये त्याच्यामध्ये टेम्पररी वाहनतळ उभे केले तर आमच्या परिसरात भरपूर अनधिकृत वाहनांचा त्रास आहे.

**दिपक खांबित :-**

तिकडे रिझर्व्हेशन कुठे आहे?

**राजेश वेतोसकर :-**

आहे ना. १११ रिझर्व्हेशन आपल्या ताब्यात आहे.

**दिपक खांबित :-**

तो गार्डनच आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created bySC/PP

**राजेश वेतोसकर :-**

पण तो आपल्याला टेम्परररी करायचा आहे ना.

**दिपक खांबित :-**

त्यात नाही करु शकत.

**राजेश वेतोसकर :-**

त्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात नाही करु शकत?

**दिपक खांबित :-**

नवघरला एस.एन. कॉलेजच्या समोर मैदानआहे. आपल त्याला मार्केटच रिझर्व्हेशन केले. तोपर्यंत आपण टेम्पररी पार्किंगच करतो. नवघर एरिया करिता.

**राजेश वेतोसकर :-**

मग तसच आपल्याकडे पण करु शकतो.

**दिपक खांबित :-**

जवळच आहे ना ते.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७५ :-**

घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्रीम. शर्मिला बगाजी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, मिरा गांव सातकरी तलावाचे सुशोभिकरण कामातंर्गत कुंपणभिंत बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरागाव येथे एम.आय.डी.सी. जवळ सातकरी तलाव असुन सदर तलावाचे सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर तलावाच्या बाहेरील बाजुस कुंपण बांधण्यात आलेले असून आतील बाजूस देखील कुंपण भिंत बांधुन दोन्ही कुंपणभिंतीच्या मधील जागेत जॉगिंग ट्रॅक करुन इतर सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर कामांतर्गत प्रथम टप्प्यात आतील बाजुस कुंपणभिंत बांधणे कामी रु. ४०,६३,४००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर तलावात जॉगिंग ट्रॅक तयार करुन सुशोभिकरण इ. कामे सुध्दा हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामी रु. ४३,६१,६००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर अंदाजपत्रकास देखील ही सभा मान्यता देत आहे. यापूर्वी सदर जागेवर धोबीघाट बांधण्याचे कामास मा. स्थायी समितीने मान्यता दिली होती. सदर ठराव अधिक्रमित करुन वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

तुम्ही धोबीघाटाला मान्यता दिली होती. तर तुम्ही तो पहिला विखंडीत का नाही केला?

**बर्नड डिमेलो :-**

त्याच्यात दिलेले आहे ना.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली सत्यप्रत





नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका